दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१६५ बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-165 Wednesday, Dt.18 February 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# महापशुधन एक्स्पोसाठी ३ कोटींचा मंडप

## स्वत:वरील गाण्यासाठी आनंद शिंदेंना कोट्यवधी दिले; करुणा शर्मांचा गंभीर आरोप

प्रतिनिधी @ मुंबई

भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडमध्ये महापशुधन एक्सो कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्याचं लक्ष वेधलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक दिग्गजांनी येथील प्रदर्शनाला भेट दिली, येथील भव्यता चर्चेचा विषय बनली होती. आता, या महापशुधन एक्स्पोच्या आयोजनावरुन करुणा शर्मांनी मंत्री पंकजा मुंडे यांना डिवचले. महापशुधन म्हणजे प्रपोगंडा करण्याचा प्रकार होता, त्याच्या मंडपासाठी तीन कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे करुणा शर्मा यांनी म्हटले.

पंकजा मुंडे यांच्यावर गाणे म्हणण्यासाठी आनंद शिंदे यांना बोलवण्यात आलं होतं. पंकजा मुंडे यांचे गाणे म्हणण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. पशूंसाठी आम्ही ५० कोटी देणार आहोत हे सांगण्यासाठी ५ कोटी रुपये जाहिरातीसाठी आणि सांगण्यासाठी खर्च करण्यात आल्याच आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे. बीडमध्ये जागोजागी जनावरांना कचरा





खाऊन जगावे लागत आहे, त्यांना चारा नाही पाणी नाही ते नालीतलं पाणी पिऊन जगत आहेत. सत्ता आणि पॉवर असलेले लोक जनतेचा पैसा खर्च करत आहेत. त्याच्यामुळे पंकजा मुंडेंवर मी एक गाणं तयार केले आहे, असे म्हणत करुणा शर्मांनी पंकजा मुंडेंवर घणाघाती टीका केली.

पंकजा मुंडेंवर बोचरी टीका

अतिवृष्टीमध्ये शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई द्यावी. सरकारने शेतकऱ्यांना हेक्टरी २५,००० मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र, तुम्ही हेक्टरी २००० रुपयेच दिले, असे म्हणत करुणा शर्मा यांनी पंकजा मुंडेंवर गाणंही सादर केलं. पंकजाताई बाग नासवते रे बीजेपीच्या कमळाचा.. असे मिश्किल गाणे म्हणत त्यांनी पंकजा मुंडेवर टीका केली. मी बीडवासियांना शब्द देते की जसं माझ्या सासर्यांनी (स्वर्गीय गोपीनाथ मुंडेंनी) जात पात न बघता गोरगरीब शेतकरी लोकांचे काम करून पुढाकार घेतला होता. परळीपासून सुरुवात करून बीड जिल्हा पूर्ण बीजेपीचा केला होता. तसेच, काम मी करणार असून लोकांच्या हितासाठी लढणार असल्याचेही करुणा शर्मा यांनी म्हटले.

### महापशुधन कार्यक्रमात पंकजा मुंडेंकडून मुख्यमंत्र्यांचं कौतुक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सदैव घड्याळाच्या काट्याप्रमाणे काम करणारे आहेत. मुख्यमंत्री साहेब मी तुमचा आदेश पाळते. पण, युतीमध्ये असल्याने आज सगळ्यांचे नाव घेऊन भाषणाला सुरुवात केली आहे. मला ग्रामविकास आणि जलसंधारण खाते मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यांच्यामुळे जलयुक्त शिवार योजना राबवू शकले. आता मुख्यमंत्र्यांनी मला पशूसंवर्धन विभागाची जबाबदारी दिली आहे. त्यानंतर आम्ही पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न केले. याला मुख्यमंत्र्यांनी मंजूरी दिली. २४ लक्ष तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी आमच्याकडे योजना आहे. या माध्यमातून मोठे काम होऊ शकणार आहे. पशुसंवर्धन खाते मला मनापासून आवडले आहे, असे त्यांनी यावेळी म्हटले.

# लेखी आदेशाशिवाय मृत्यू पत्करेन पण उपोषण सोडणार नाही

## कारभारी महाराजांचा सरकारला थेट इशारा, २३ व्या दिवशी प्रकृती गंभीर

जालना / शेख फारुक

जालना सहकारी साखर कारखान्याच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या निर्णयांविरोधात सुरू असलेले कारभारी महाराज अंभोरे यांचे आमरण उपोषण आज २३ व्या दिवशी अधिक तीव्र टप्प्यावर पोहोचले आहे. प्रशासनाच्या दिरंगाईवर संतप्त होत लेखी आश्वासनाशिवाय उपोषण सोडणार नाही. गरज पडली तर प्राणाची आहुती देईन असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

प्रस्तावित जालना-नांदेड समृद्धी महामार्ग जाणीवपूर्वक जालना सहकारी कारखान्यातून वळवण्यात आल्याचा गंभीर आरोप करत हा मार्ग तात्काळ रद्द करण्याची मुख्य मागणी आंदोलनकर्त्यांनी लावून धरली आहे.या निर्णयामागे मोठा आर्थिक आणि राजकीय डाव असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

कारखाना ईडीच्या ताब्यातून काढा अन् शेतकऱ्यांच्या ताब्यात द्या..

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये ईडीच्या ताब्यातील जालना सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या ताब्यात देणे अशी आहे. याशिवाय कारखान्याच्या खरेदी-विक्री व्यवहाराची निवृत्त न्यायाधीश किंवा लोकपाल यांच्यामार्फत चौकशी सर्व मागण्यांबाबत लेखी शासन आदेश देणे यांचा समावेश आहे. या




मागण्या शेतकऱ्यांच्या अस्तित्वाशी जोडलेल्या असून सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

प्रकृती ढासळली...

वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गंभीर इशारा आज दिवसभर तीन वैद्यकीय पथकांनी तपासणी केली असता कारभारी महाराजांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. दीर्घ उपोषणामुळे शरीरावर गंभीर परिणाम होत असून परिस्थिती धोक्याच्या टप्प्यावर पोहोचत असल्याचे सांगण्यात आले.तरीही उपोषणकर्त्यांनी मागे हटण्यास नकार दिला आहे.

मा.आ.कैलास गोरंट्याल यांची भेट

सरकार दरबारी बोलणी सुरू असल्याचा दावा जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंट्याल यांनी उपोषणस्थळी भेट देऊन कारभारी महाराजांना उपोषण सोडण्यासाठी मनविण्याचा प्रयत्न केला. मात्र महाराजांनी स्पष्ट शब्दांत सांगितले लेखी आदेश मिळाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही. गोरंट्याल यांनी सांगितले की, उपोषणकर्त्यांच्या मागण्यांबाबत सरकार दरबारी माझे सर्व प्रयत्न सुरू आहेत.वरिष्ठ पातळीवर चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत आहे.त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलणी करण्याचे आश्वासनही दिले.

साखर कारखाना बचाव समितीचा लढा निर्णायक टप्प्यावर..

जालना सहकारी साखर कारखाना बचाव समितीच्या वतीने सुरू असलेल्या या संघर्षाला व्यापक पाठिंबा मिळत असून उपोषणस्थळी अंकुश देशमुख,अंकुश राऊत, सुभाष कोळकर,सोपानराव भांदरगे,ज्ञानेश्वर भांदरगे,अरुण वझरकर,रावसाहेब पवार, कमलाकर अंभोरे,कैलास फुलारी,लक्ष्मण शिंदे,नारायण वाडेकर,प्रल्हाद पडूळ,नामदेव पवार,सुभाषराव राठोड आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सरकारची प्रतिष्ठा पणाला आंदोलन उग्र होण्याचा इशारा..

कारभारी महाराजांची प्रकृती गंभीर होत असताना सरकारने ठोस निर्णय न घेतल्यास या आंदोलनाचे रूपांतर राज्यव्यापी शेतकरी आंदोलनात करण्याचा इशारा देण्यात आला आहे.शेतकऱ्यांच्या हक्कांचा हा लढा सरकारसाठी मोठी राजकीय कसोटी ठरत असून प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते याकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे

# आ. सुरेश धस यांची पोखरी येथील अपघातप्रवण ब्लॅक स्पॉटला भेट

## वळण कमी करून पूल उंचावण्याच्या सूचना

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी मतदारसंघातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५६१ (अहिल्यानगर-अहमदपूर) या महत्त्वाच्या मार्गावर आष्टी ते चिंचपूर दरम्यान सिमेंट काँक्रीट व रस्ता रुंदीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यातील मौजे पोखरी येथे असलेल्या धोकादायक ब्लॅक स्पॉट ची आ. सुरेश धस यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

पोखरी गावाजवळील पुलासमोरील तीव्र दुहेरी वळण हे अपघातांचे मुख्य कारण ठरत असल्याचे यावेळी निदर्शनास आले. पुलाची उंची कमी असल्याने आणि रस्त्याचे वळण अचानक व तीव्र असल्यामुळे समोरून येणारी वाहने वेळेवर दिसत नाहीत. परिणामी, मागील काही वर्षांत या ठिकाणी सुमारे १५ ते २० जणांचा अपघाती मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांनीही या समस्येबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. यावेळी संबंधित आरआरएसएम इन्फ्रा लि.चे प्रोजेक्ट मॅनेजर जोशी, बांधकाम विभागाचे अभियंता पानससंबळ, स्थानिक सरपंच अंगद शिंदे, श्रीरंग खांडवे तसेच पोखरी व आंधळेवाडी येथील ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते. सर्वांनी मिळून संबंधित ठिकाणाची सविस्तर पाहणी करून तांत्रिक बाबींचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान रस्त्याचे धोकादायक दुहेरी वळण कमी करून नवीन डिझाइननुसार रस्ता अधिक सरळ करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले.



तसेच पुलाची उंची वाढवून दृष्टीक्षेप (व्हिजिबिलिटी) सुधारल्यास अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, असे मत व्यक्त करण्यात आले.

आ. सुरेश धस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या कामाला प्राधान्य देऊन तातडीने सुधारित आराखडा सादर करण्याच्या आणि काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या जीविताशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड चालणार नाही. सुरक्षित आणि दर्जेदार रस्ता बांधकाम हे प्रशासनाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. स्थानिक ग्रामस्थांनीही या पाहणीबद्दल समाधान व्यक्त करत लवकरात लवकर कायमस्वरूपी उपाययोजना व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या सुधारणांमुळे भविष्यातील अपघात टळून नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

## नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन दि. १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी यंशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते ८.३० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाटक दर्याभवानी ४० कलाकारांच्या संचात सादरीकरण होणार आहे.

तसेच दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते १.०० वाजेपर्यंत त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शाहिरी लोकधारा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन




करण्यात आले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



**मुक्रमाबाद ।प्रतिनिधी**

**मुक्रमाबाद शहराचे सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र सातत्याने कार्यरत असनारे शहरातील विकास कामे प्रगती पथावर नेणारे आदर्श सरपंच सौ. अंजिताताई बालाजी आप्पा बोधने यांना आज दि. १७-०२-२०२६ रोज मंगळवारी नांदेड येथे लोकमत कार्यालयात 'लोकमत गौरव पुरस्कार'सहपत्नीक सत्कार करून पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे गावातील व परिसरातील जनतेकडून त्यांच्यावर अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.**

# चौसाळा येथे मा. खा. प्रितमताई मुंढे यांचा वाढदिवस विविध समाज उपयोगी उपक्रम राबवुन साजरा

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे मा. खासदार प्रितमताई मुंढे यांचा वाढदिवस भारतीय जनता पार्टी बीड तालुका मंडळाच्या वतीने विविध समाज उपयोगी उपक्रम राबवुन साजरा करण्यात आला चौसाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णाना फळ वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा बीड तालुका मंडळ प्रमुख अशोक(दादा)रसाळ, भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुकाध्यक्ष पवन कुचेकर,बीड



तालुका उपप्रमुख अंकुश गोरे, भाजपा बीड तालुका सरचिटणीस अप्पासाहेब झोडगे, भागवतराव आंधळे, चौसाळा शहर अध्यक्ष विनोद कळासे, महादेव चौधरी, बाळासाहेब हावळे पाटील, अक्षय माळी, पत्रकार बळीराम राऊत, प्रदीप जोगदंड यांच्यासह असंख्य भाजपा पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5



संपादकीय....

# ‘उबाठा’चा केवळ शून्याचा ताळेबंद

गेल्या साडेसहा वर्षांत उबाठाने आपण केलेल्या राजकारणाचा ताळेबंद मांडण्याचा प्रयत्न केला तर जमा बाजूला मोठ्या शून्याशिवाय काहीच दिसणार नाही. साहजिकच त्यांच्या राजकीय अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे आहे.

मुंबईच्या महापौरपदी भारतीय जनता पक्ष- महायुतीच्या रितू तावडे आणि उपमहापौरपदी शिवसेनेचे संजय घाडी यांनी अलीकडेच आपल्या पदांचा कार्यभार स्वीकारला. मुंबईवर भाजप-महायुतीचा भगवा मोठ्या डौलाने फडकला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जातीने उपस्थित होते. ४४ वर्षांनी मुंबईचे महापौरपद भारतीय जनता पक्षाला मिळाले आहे. १९८२ मध्ये डॉ. प्रभाकर पै हे भाजपतर्फे महापौरपदी निवडून आले होते. रितू तावडे यांच्या निवडीने भारतीय जनता पक्षाची, ‘मुंबईचा महापौर हिंदूच होईल आणि मराठी व्यक्तीच होईल,’ ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. मुंबईच्या महापौर-उपमहापौर निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी परभणीच्या महापौरपदाची निवडणूक झाली. या निवडणुकीत उबाठाचे सलीम जाफर हे काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपदी विराजमान झाले. १९९० च्या दशकात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी लोकसभा-विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात, ‘खान हवा की बाण हवा’, असे वक्तव्य केले होते. वंदनीय बाळासाहेबांचे हे उद्गार संपूर्ण मराठवाड्यात परिणामकारक ठरले. संभाजीनगर, परभणी, हिंगोली अशा लोकसभेच्या जागांवर शिवसेनेला सातत्याने विजय मिळाला. त्याच परभणीत उबाठांनी खान महापौर करावा, याला काय म्हणावे?

मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरेंनी आपली होती नव्हती तेवढी पुण्याई पणाला लावली होती. विधानसभा निवडणुकीत दणकून पराभूत झालेल्या उबाठांना मुंबई महापालिकेचाच आधार उरला होता. भारतीय जनता पक्षाच्या विरोधात असलेल्या प्रसारमाध्यमातील, समाजकारणातील प्रभावशाली मंडळींनी उबाठांना ही निवडणूक जिंकावी, यासाठी देव पाण्यात घातले होते. वेगवेगळ्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या विरोधात अत्यंत विखारी प्रचार केला गेला. तरीही भाजप-महायुतीने मुंबई महापालिका निवडणूक जिंकलीच. अनेक महापालिकांमध्ये उबाठांना आपले खातेही उघडता आलेले नाही. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये उबाठांना ५० जागाही जिंकता आलेल्या नाहीत. २०२२ मध्ये मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर व २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही मुंबई महापालिका आपलीच आहे, या भरवशावर उद्धव ठाकरे आणि त्यांचे शिलेदार होते. कोणत्याही परिस्थितीत मुंबई जिंकायचीच या ईर्षेने उबाठांनी राज ठाकरेंशीही हातमिळवणी केली. त्याही पुढे जाऊन कट्टर मुस्लिम संघटनांना मुस्लिम महापौर करण्याचे आश्वासनही देऊन टाकले. न्यूयॉर्कच्या महापौरपदी मुस्लिम व्यक्तीची निवड झाल्यानंतर भारतविरोधी शक्तींना प्रचंड आनंद झाला होता. भारतातील हिंदू-मुस्लिम धर्मीयांमध्ये आणखी फूट पाडून धार्मिक अशांतता निर्माण करण्याच्या देशविरोधी शक्तींच्या हालचालींना मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गती आली होती. मुंबई भाजप अध्यक्ष आ. अमित साटम यांनी भाजप-महायुतीला बहुमत मिळाल्यास हिंदू-मराठी व्यक्तीच महापौर होईल, असे जाहीर केले होते. उद्धव ठाकरेंनीही असे आश्वासन द्यावे, असे आव्हान आ. साटम यांनी दिले होते. मात्र उबाठांनी व संजय राऊतांनी हे आव्हान स्वीकारले नाही. उबाठाला बहुमत मिळाल्यास हिंदू व्यक्ती महापौर होईल, मुस्लिम होणार नाही, असे जाहीरपणे सांगण्याचे धाडस उद्धव ठाकरेंनी दाखवले नाही. मुंबई महापालिकेच्या सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी उबाठांनी ठेवली होती, हे यातून दिसले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उबाठा आणि काँग्रेसला व्होट जिहादमुळेच भाजप-महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या. उबाठांना व्होट जिहादच्या प्रयोगामुळेच महापालिका निवडणुकीतही मुंबईत यश मिळवण्याची स्वप्ने पडत होती. आपल्या वडिलांनी म्हणजे वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी काँग्रेसच्या मुस्लिम लांगूलचालनाच्या राजकारणाविरोधात सातत्याने प्रहार केले, याचा विसर उद्धव ठाकरेंना पडला होता. काँग्रेस आणि शरद पवारांच्या मदतीने उद्धव ठाकरेंनी अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद मिळवले, पण त्या बदल्यात उद्धव ठाकरेंनी आपले प्रचंड नुकसान करून घेतले. अर्थात उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य व महाविद्वान सल्लागार संजय राऊत यांना आपण काय चूक केली हे कळणार नाही.

# संघर्ष, स्वप्न आणि समाजसेवेचा अखंड प्रवास म्हणजे श्री. अजय पांडुरंग कापरे सर

आष्टी ।प्रतिनिधी

स्वप्न पाहणं सोपं असतं; पण त्या स्वप्नासाठी आयुष्य झोकून देणं कठीण असतं. या वाक्याचा प्रत्यय ज्यांच्या जीवनप्रवासातून येतो, ते म्हणजे श्री. अजय पांडुरंग कापरे. संघर्षाच्या खडतर वाटेवरून चालत, अपयशाचे चटके सहन करत आणि परिस्थितीशी दोन हात करत त्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

त्यांचा प्रवास हा केवळ यशोगाथा नसून जिद्दीचा, धैर्याचा आणि समाजाभिमुखतेचा प्रेरणादायी आदर्श आहे. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी त्यांच्या आयुष्याला दिशा देणारा क्षण आला. शाळेत मा. श्री. आबासाहेब राऊत सर, ग. दि. माडगूळकर लिखित औंदाचा राजा हा धडा शिकवत होते. त्या कथेतून उलगडलेली सर्जनशीलता, कथानकाची ताकद आणि शब्दांची जादू अजय यांच्या मनाला भिडली. त्या दिवशी त्यांनी मनाशी पक्का निर्धार केला आपणही चित्रपटसृष्टीत जाऊन लेखक-दिग्दर्शक व्हायचं! स्वप्न मोठं होतं, पण त्यासाठी लागणारी साधनं नव्हती; मात्र मनात प्रचंड आत्मविश्वास होता.

बारावी पूर्ण झाल्यानंतर मित्र सोमनाथ बनसोडे यांच्या सोबत त्यांनी स्वप्नांची नगरी मुंबई गाठली. घरातून निघताना डोळ्यांत स्वप्नं आणि मनात आशा होती; परंतु मुंबईने पहिल्याच दिवशी वास्तवाचं कठोर रूप दाखवलं. राहायला जागा नाही, हातात पैसा नाही, ओळखी नाहीत अशी बिकट अवस्था निर्माण झाली. काही दिवस त्यांनी पनवेल बस स्थानकावर रात्र काढली. दिवसभर कामाच्या शोधात भटकंती आणि रात्री उघड्यावर झोप हीच दिनचर्या झाली. पोटातील भूक असह्य झाली तेव्हा एका धाब्यावर भांडी घासण्याचं काम स्वीकारलं. परंतु या परिस्थितीने त्यांची स्वप्नं मोडली नाहीत; उलट त्यांची जिद्द अधिकच बळकट झाली. एक दिवस फिल्मी पडद्यावर लेखक म्हणून माझं नाव झळकणारच, हा विश्वास त्यांनी मनाशी जपला.

सातत्याने प्रयत्न, लोकांशी संपर्क आणि लेखनाचा सराव यामुळे अखेर २००४ साली कोई है या चित्रपटात संवाद लेखनाची संधी मिळाली. हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा ठरला. संघर्षाच्या दिवसांत पाहिलेलं स्वप्न आता साकार होऊ लागलं होतं. त्यानंतर त्यांनी दूरदर्शन सह्याद्री या वाहिनीवर प्रसारित झालेल्या अशा अभिलाषा, कुजबुज, दक्षता, करायचं काय? आणि आनंदमहीमा या मालिकांसाठी लेखन केलं. त्यांच्या लेखणीत वास्तववादी संवाद, सामाजिक जाणीव आणि भावनिक स्पर्श दिसून येतो. तसेच बालाजी टेलिफिल्म्स अंतर्गत काव्यांजली आणि कस्तुरी या मालिकांमध्येही त्यांनी लेखक म्हणून काम केलं. मराठी आणि हिंदी मनोरंजन क्षेत्रात त्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं.

मात्र चित्रपटसृष्टीतील कामाचं अनियमित स्वरूप आणि वाढत्या कौटुंबिक जबाबदाऱ्या लक्षात घेता त्यांनी व्यावसायिक क्षेत्रात पाऊल टाकण्याचा निर्णय घेतला. पत्रकार मारुती सत्रे यांच्या सोबत हॉटेल व्यवसाय, बांधकाम व्यवसाय आणि रेल्वे कॉन्ट्रॅक्ट यांसारख्या विविध क्षेत्रांत त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली. प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिकपणा, नियोजन आणि कष्ट या तत्त्वांवर त्यांनी भर दिला. व्यवसाय करताना त्यांनी केवळ आर्थिक यशाचाच विचार केला नाही, तर स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावरही लक्ष केंद्रित केलं.

श्री. अजय कापरे सर यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात प्रभावी बाजू म्हणजे त्यांची समाजसेवेची तळमळ. २०१५ साली आष्टी तालुक्यात भीषण



दुष्काळ पडला असताना त्यांनी स्वर्गीय राहुल रमेश पाटील यांच्या सोबत जवळपास २०० शेतकऱ्यांना बी-बियाणे आणि खतांचे वाटप केले. अनेक मजुरांना अन्नधान्य देऊन त्यांना दिलासा दिला. ही मदत केवळ आर्थिक नव्हती; ती भावनिक आधारही होती. कारण त्यांनी स्वतः आयुष्यात भूक आणि अभाव अनुभवले होते. गेल्या पाच वर्षांपासून पनवेल परिसरातील बेघर वस्तीत राहणाऱ्या सुमारे ५० मुलांना दररोज एक वेळचे जेवण देण्याचा उपक्रम ते सातत्याने राबवत आहेत. या उपक्रमामागे प्रसिद्धीची अपेक्षा नाही; आहे ती केवळ माणुसकीची जाणीव. स्वतः संघर्षातून उभे राहिल्यामुळेच इतरांच्या वेदना त्यांना जवळून समजतात. म्हणूनच त्यांच्या समाजसेवेत प्रामाणिकपणा आणि सातत्य दिसून येतं. त्यांचा जीवनप्रवास सांगतो की, परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द आणि चिकाटी असेल तर मार्ग नक्की सापडतो. अपयश हा शेवट नसून नव्या सुरुवातीचा टप्पा असतो. स्वप्नं मोठी असावीत, पण त्यासाठी कष्ट करण्याची तयारी त्याहून मोठी असावी, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिलं आहे.

आज श्री. अजय पांडुरंग कापरे सर हे लेखक, उद्योजक आणि समाजसेवक या तिन्ही भूमिकांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांचा प्रवास हा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. आगामी काळात त्यांच्या कार्याचा विस्तार अधिक व्यापक व्हावा, त्यांच्या लेखणीतून समाजाला नवी दिशा मिळावी आणि समाजसेवेची ही ज्योत अधिक तेजस्वी व्हावी, हीच सदिच्छा..!

शब्दांकन.....
**- राजेंद्र लाड, आष्टी**
९४२३१७०८८५

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील जलसंवर्धन कार्य..

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांची ओळख स्वराज्य निर्माता म्हणून जितकी आहे तितकीच रयतेचा राजा म्हणून देखील आहे. आपल्या स्वराज्यात असणारी प्रजा ही सर्वाधिक महत्वाची आहे. त्यांच्या समस्या सोडवणे याला प्राधान्य असले पाहिजे याबाबत ते आग्रही होते.

राजांची ओळख कुशल प्रशासक म्हणून देखील आहे. यासोबतच रयतेचा राजा म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या रयतेसाठी असणारे पाण्याचं महत्व जाणलं आणि यासाठी त्यांनी जलसंवर्धन कार्याला वेगळे आयाम दिले. त्यांचे याबाबतीत असलेला अभ्यास आणि धोरणीपणा आजच तितकाच मोलाचा ठरतो.आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी नवी नाही. त्याकाळी आणि आजही शेती पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळेच त्यांचे या क्षेत्रात असणारे योगदान आजही मार्गदर्शक असे आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात जलव्यवस्थापनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. पाणी ही केवळ जीवनावश्यक गरज नसून शेती, लोककल्याण आणि किल्ल्यांची सुरक्षा यासाठीही ते तितकेच आवश्यक आहे, याची महाराजांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळे त्यांच्या काळात जलसंवर्धन, पाणी साठवण आणि योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला.

भौगोलिक परिस्थितीची जाण




महाराष्ट्राचा मोठा भाग डोंगराळ व पावसावर अवलंबून आहे. विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये पाण्याचे स्रोत ऋतुनिष्ठ असतात. ही परिस्थिती ओळखून शिवाजी महाराजांनी पावसाचे पाणी अडवणे आणि साठवणे यावर भर दिला.

किल्ल्यांवरील जलव्यवस्था...

शिवकालीन किल्ले ही जलसंवर्धनाची उत्कृष्ट उदाहरणे मानली जातात.

रायगड किल्ला, राजगड किल्ला यांसारख्या किल्ल्यांवर...

-दगडात कोरलेली टाकी (पाण्याची टाकी) बांधण्यात येत
-पावसाचे पाणी साठवण्यासाठी तलाव तयार केले जात
-झऱ्यांचे पाणी सुरक्षित मार्गाने टाक्यांमध्ये आणले जात
-किल्ल्यावर वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा राखला जाई यामुळे दीर्घकालीन वेढ्यातही किल्ले टिकून राहत.

लोकाभिमुख धोरण...

शिवाजी महाराजांच्या प्रशासनात प्रजेच्या गरजांना प्राधान्य होते. गावागावांत विहिरी, तलाव, बंधारे बांधण्यास प्रोत्साहन दिले जाई. शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध राहावे यासाठी लहान सिंचन व्यवस्थाही उभारल्या गेल्या आणि त्यामुळे गावागावात पाण्याची उपलब्धता सातत्यपूर्ण होती ज्यामुळे जीवनाला स्थैर्य प्राप्त होऊ शकले. गावालगत असणाऱ्या मंदिरालगत असणाऱ्या विहिरी आणि बारव आपण आज ही अस्तित्वात आहेत असे बघतो.

पर्यावरणपूरक दृष्टीकोन...

जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी जंगलांचे महत्त्व त्यांनी ओळखले होते. डोंगरउतारांवरील झाडी राखल्याने पाणी धरून ठेवण्यास मदत होते, याची जाण त्या काळातही होती. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा समतोल राखण्याची परंपरा दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जलसंवर्धन कार्य हे दूरदृष्टी, शास्त्रीय विचार आणि स्थानिक भौगोलिक जाण यांचे सुंदर मिश्रण होते. आजच्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर शिवकालीन पाणी व्यवस्थापन आपल्याला शाश्वत जलवापराचा मौल्यवान धडा देते. त्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेऊन आधुनिक काळातही जलसंवर्धन अधिक प्रभावीपणे राबवता येऊ शकते.

शब्दांकन....
**प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६

# कर्तृत्ववान नेतृत्वाचा वाढदिवस - श्री. राजेंद्र (आण्णा) दहातोंडे महाराज

आष्टी - (राजेंद्र लाड) लोकनेते, मराठवाडा भूषण सुरेश (अण्णा) धस यांचे निष्ठावंत, विश्वासू आणि खंदे समर्थक म्हणून ओळख असलेले कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती, शांत, संयमी व मितभाषी व्यक्तिमत्त्वाचे धनी श्री. राजेंद्र (आण्णा) दहातोंडे महाराज यांचा वाढदिवस सर्व स्तरांतून उत्साहात साजरा होत आहे. श्री. दहातोंडे महाराज यांनी आपल्या कार्यातून नेहमीच संघटन कौशल्य, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी यांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले आहे. राजकारण आणि समाजकारण यांचा समतोल साधत त्यांनी सर्वसामान्य शेतकरी, व्यापारी व नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले.




कडा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उपसभापती पदाची धुरा सांभाळताना त्यांनी पारदर्शक कारभार, शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस निर्णय आणि बाजार व्यवस्थेतील शिस्त यावर विशेष भर दिला. त्यांच्या शांत आणि संयमी स्वभावामुळे विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधणे त्यांना सहज शक्य झाले. मतभेद असले तरी संवादातून मार्ग काढणे, कार्यकर्त्यांना योग्य दिशा देणे आणि प्रत्येकाला सोबत घेऊन चालणे ही त्यांची कार्यशैली ठळकपणे दिसून येते. त्यामुळेच ते केवळ राजकीय नेते नसून एक प्रभावी संघटक म्हणूनही ओळखले जातात.

लोकनेते सुरेश (अण्णा) धस यांच्या नेतृत्वाखाली काम करताना त्यांनी निष्ठा आणि प्रामाणिकपणा जपत संघटनेची ताकद वाढवली. कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे नाते, सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आणि गावोगावी संपर्क ठेवून त्यांनी लोकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम, शुभेच्छांचा वर्षाव आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळत आहे. त्यांच्या पुढील आयुष्यात उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिकाधिक यश लाभो, अशी सर्वच स्तरांतून सदिच्छा व्यक्त होत आहेत. शांत स्वभाव, ठाम भूमिका आणि लोकाभिमुख कार्यशैली यांचा सुंदर संगम असलेले श्री. राजेंद्र (आण्णा) दहातोंडे महाराज यांचे आयुष्य समाजसेवेत अधिकाधिक उज्ज्वल होत राहो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा..!!!

# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमासाठी दोन दिवसात येणाऱ्या १५ लाखाहून अधिक भाविकांसाठी सूक्ष्म नियोजन

## प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

नवी मुंबई ।प्रतिनिधी

‘हिंद-दी-चादर’ या भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी आज दूरदृश्यप्रणालीव्दारे संबंधित यंत्रणांची पूर्वतयारीची सविस्तर बैठक घेऊन आढावा घेतला. कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत सर्व विभागांनी समन्वयाने काम करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडावा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.बैठकीदरम्यान कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कोकण विभागातील संबंधित यंत्रणांनी आतापर्यंत केलेल्या कामांचा सविस्तर अहवाल सादर केला. या बैठकीस विभागीय अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, अपर आयुक्त (महसूल) वैशाली इंदानी-उटवाल, अपर आयुक्त (विकास) माणिक दिवे, अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे, सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन) विजयकुमार म्हसाळ, सहआयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, उपायुक्त (नगरपालिका) डॉ. सागर घोलप, सहआयुक्त (विकास) डॉ.प्रदीप घोरपडे, प्रभारी माहिती उपसंचालक मनोज सानप, तहसिलदार गजानन धुमाळ उपस्थित होते.



यावेळी कोंकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कार्यक्रमस्थळी पायाभूत सुविधा, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सेवा, स्वच्छता व आपत्कालीन यंत्रणा आदी बाबींबाबतची तयारी पूर्णत्वाकडे जात असल्याची माहिती दिली.

कार्यक्रमस्थळी येणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष मार्गयोजना तयार करण्यात आली आहे. पोलीस विभागाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार असून सीसीटीव्ही यंत्रणा, नियंत्रण कक्ष तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

आरोग्य सेवांच्या दृष्टीने ग्रामीण भागात आतापर्यंत २ हजार १५९ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली असून, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे. कार्यक्रमस्थळी ५ तात्पुरती वैद्यकीय केंद्रे आणि एक आयसीयू उभारण्यात येणार आहे. तसेच जवळील रुग्णालयांमध्ये ३५० खाटा आणि ७५ आयसीयू खाटा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. आरोग्य विभागामार्फत तात्पुरती वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका व प्राथमिक उपचार केंद्रांची व्यवस्था केली जाणार असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

या कार्यक्रमासाठी निवडण्यात आलेल्या खारघर, नवी मुंबई येथील ओवे मैदानाची क्षमता एकावेळी सुमारे ५ लाख भाविकांची असून, मुख्य मंडपात ८० हजार भाविक बसू शकतील, अशी व्यवस्था करण्यात येत आहे. लंगर व्यवस्थेसाठी सुमारे अडीच लाख भाविकांचा विचार करण्यात आला असून, १२ हजार ५०० भाविकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील ५ दिवसांत ते पूर्ण होणार आहे.तसेच पाणीपुरवठा, स्वच्छतागृहे, वीजपुरवठा आणि प्रकाशयोजना यांसाठी संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

कार्यक्रमादरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कार्यवाही करावी, असे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी अधोरेखित केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचार व प्रसिध्दी हा महत्वाचा भाग असल्याने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी कोकण विभागातील शासकीय व खासगी शाळांमध्ये आतापर्यंत राबविण्यात आलेल्या हिंद दी चादर कार्यक्रमाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी राबविण्यात येत असलेल्या प्रभातफेऱ्या, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता मोहीम अशा विविध कार्यक्रमांचा अहवाल सादर केला.

कोकण विभागांतर्गत येणाऱ्या ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हयांच्या ग्रामीण भागातील ५ लाख १७ हजार विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभाग घेतला असून, ४ हजार ३८१ फोटो आणि २ हजार १२५ व्हिडिओ हिंद दी चादर या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या र्हीींिं:// र्सीींिंशसलरहरर्वीीहरहळवळ.ले या पोर्टलवर अपलोड करण्यात आले आहेत.

नगरपालिका आणि महापालिका क्षेत्रातील सुमारे १७ लाख विद्यार्थी विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाच्या प्रचारासाठी मुंबई शहर, उपनगर आणि कोकण विभागातील सर्व चित्रपटगृहांमध्ये सुप्रसिध्द गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले विशेष गीत प्रदर्शित करण्यात येत आहे. तसेच मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, पनवेल, उल्हासनगर, भिवंडी या नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात एकूण २१९ होर्डिंगजवर हिंद दी चादर कार्यक्रमाची प्रचार प्रसिध्दी करणारे मजकूर लावण्यात आले आहेत.

देशभरातून या समागम कार्यक्रमास येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता वाहतूक व्यवस्थेसाठी ३० पार्किंग स्थळांची निश्चिती करण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी कोपरा या ठिकाणी तात्पुरता पूल उभारण्यात येत आहे. एसटी, बसेससाठी निश्चित केलेल्या वाहततळापासून मुख्य कार्यक्रमस्थळापर्यंत पायी जाणाऱ्या भाविकांसाठी मुख्य रस्त्याच्या बाजूने तातुरत्या स्वरुपातील पायवाट तयार करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत. जेएनपीए परिसरात दररोज सुमारे २५ हजार जड वाहनांची ये-जा होत असल्याने, वाहतुकीचे नियोजन जिल्हा प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून करण्यात येत आहे.

कार्यक्रमस्थळी पाणीपुरवठा, वीजपुरवठा आणि स्वच्छतेची विशेष काळजी घेण्यात आली आहे. लंगर व्यवस्थेसाठी १ हजार गॅस सिलेंडर आणि आवश्यक इंधनाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ४० ते ५० लाख पाण्याच्या बाटल्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात येत आहे.

या बैठकीस अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, पुणे महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, नाशिक महसूल आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, रत्नागिरी जिल्हाधिकारी मनुज जिंदाल, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, उपजिल्हाधिकारी (रोहयो) नवी मुंबई समागम समन्वय अधिकारी रविंद्र राठोड, इतर महसूल विभागातील इतर जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषद उप मुख्य कार्यकारी अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे कोकण विभागीय अधिकारी, पनवेल व नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त, महसूल, जिल्हा परिषद, शिक्षण, आरोग्य, नगरपालिका, पोलीस विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे शेतकरी विरोधी भारत-अमेरिका कृषी कराराची प्रतिकात्मक होळी

## दिशाभूल करणाऱ्या मुख्यमंत्र्यांचा निषेध - डॉ. गणेश ढवळे



लिंबागणेश |प्रतिनिधी

अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार कराराबाबत राज्य सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोप डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी येथे आयोजित महा एक्स्पो २०२६ पशुप्रदर्शनात भारत-अमेरिका व्यापार कराराचे स्वागत करत अमेरिकेची मोठी बाजारपेठ भारतासाठी खुली झाल्याचे सांगितले होते. कृषी क्षेत्रात कोणत्याही अमेरिकन मालाला भारतात खुली सूट दिलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

मात्र, या वक्तव्याला विरोध करत डॉ. गणेश ढवळे यांनी प्रत्यक्षात अमेरिकन कृषी प्रक्रिया मालावर शून्य टक्के आयात शुल्क देण्यात आल्याचा, तर भारतीय कृषी मालावर १८ टक्के शुल्क कायम असल्याचा आरोप केला. या निषेधार्थ किसान सभेच्या आवाहनाला प्रतिसाद देत आज दि.१७ मंगळवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भारत-अमेरिका कृषी कराराची प्रतीकात्मक होळी करण्यात आली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजाभाऊ गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात,शेख समीर, लेनाजी गायकवाड, सुरेश निर्मळ,अँड.गणेश वाणी,विक्रांत वाणी, सर्पमित्र अशोक जाधव, संतोष भोसले,विक्रम दाभाडे,संभाजी वाणी, अंकुश जाधव, दगडु ढवळे, सर्जेराव घरत, सिताराम कदम, भगवान लगास, विलास ढवळे, आसाराम जाधव, सुधीर क्षीरसागर आदी सहभागी होते.

सोयाबीन, इथेनॉल, जीएम सोयाबीनपासून तयार खाद्यतेल, पशुखाद्य, सुकामेवा, फळे-भाज्या व पोल्ट्री उत्पादनांवरील सवलतीमुळे भारतीय बाजारपेठेवर विपरीत परिणाम होणार असल्याचा दावा डॉ. गणेश ढवळे यांनी केला. सोयाबीनचा हमीभाव ५३३० रुपये असताना शेतकऱ्यांना सुमारे साडेतीन हजार रुपयांत विक्री करावी लागत असल्याचे सांगत भावांतर योजनेतून नुकसानभरपाई देणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कापसाचे दर हमीभावाखाली गेल्याबद्दलही त्यांनी सरकारवर टीका केली. सीसीआयमार्फत खरेदी केलेला कापूस बाजारभावापेक्षा कमी दरात विक्रीस काढल्याने दर घसरल्याचा आरोप करत उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावासह संपूर्ण खरेदीची कायदेशीर हमी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९७/२०२६**
विष्णु विरुध्द निरंक
**(मार्फत-अॅड.एस.डी.सानप)**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण पि.बापुराव राऊत हे दि.२६.१०.२०२२ रोजी मौजे मुधापुरी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. विष्णु पि.लक्ष्मण राऊत, वय-५० वर्षे, धंदा-मजुरी, रा.मुधापुरी ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लक्ष्मण पि.बापुराव राऊत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२०/०३/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०१/२०२६**
बाबासाहेब पि.बाबुराव शिंगाडे व इतर
**(मार्फत-अॅड.आर.डी.भांबरे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **सुशीलाबाई पि.बाबुराव शिंगाडे, रा.लुखा मसला ता.गेवराई जि.बीड हे दि.१६.१२.२०२१ रोजी रा.लुखा मसला ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **बाबासाहेब पि.बाबुराव शिंगाडे, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा.लुखा मसला ता.गेवराई जि.बीड, सत्यशिला भ्र.राजेंद्र महारनवर, वय-६३ वर्षे, धंदा-घरकाम, रा.धामणगांव पो.तेलांगघशी ता.जामखेड जि.अहिल्यानगर, राधाबाई भ्र.प्रल्हाद खताळ, वय-६० वर्षे, धंदा-शेती, रा.माळेवाडी पो.येळंब ता.शिरूर जि.बीड** यांनी सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गेवराई ता.गेवराई जि.बीड | ५२१७०२४६७१५ | रु.३०९७०९.५१/- |

वरील रक्कम मिळणे कामी अर्जदार यांना उत्तराशिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **सुशीलाबाई पि.बाबुराव शिंगाडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१७/०२/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२३/०३/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.१३.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख रईस शेख महेबुब रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख रईस शेख महेबुब | स्वतः | ०७.०७.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.०५.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख अनिस शेख महेबुब रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अनिस शेख महेबुब | स्वतः | ०१.०७.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.१३.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख रफिक शेख महेबुब रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख रफिक शेख महेबुब | स्वतः | ०१.०१.१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि- दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख हनिफ शेख महेबुब रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख हनिफ शेख महेबुब | स्वतः | १७.०६.१९६९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४६ दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुमैय्या चाँद शेख रा.बदापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमैय्या चाँद शेख | स्वतः | १५.०८.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४१ दि.०८.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **गंगाराम भिवराजी लांडे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | केदार गंगाराम लांडे | मुलगा | ०७.०९.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९६९ दि.१६.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **युनूस अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आलिया युनूस शेख | मुलगी | १९.०४.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९६९ दि.१६.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल्ला अश्रफ शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युनूस अब्दुल्ला शेख | मुलगा | २८.०६.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४८ दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री चाँद मोईनोद्दीन शेख रा.बदापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | चाँद मोईनोद्दीन शेख | स्वतः | ०१.०१.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४७ दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमती शबाना कदीर शेख रा.बदापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शबाना कदीर शेख | स्वतः | ०१.०१.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८४९ दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख मुसेफ चाँद शेख रा.बदापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुसेफ चाँद शेख | स्वतः | २७.०७.२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८५० दि.१४.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सानिया चाँद शेख रा.बदापुर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सानिया चाँद शेख | स्वतः | ०५.०७.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास शक्य -विजया रहाटकर

## 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट- २०२६'मध्ये महिला समृध्दीचा निर्धार




नवी दिल्ली ।प्रतिनिधी

आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ एक तांत्रिक साधन नसून शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू ठरत आहे. आगामी काळात एआयमुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असून महिलांनी या तंत्राच्या केवळ 'वापरकर्त्या' म्हणून न राहता संशोधक आणि निर्माते होऊन नव्या परिवर्तनाचे नेतृत्व करावे. महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास होउ शकेल असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केला.

दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग , आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था (युनिटार) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एआय आणि आर्थिक शक्ती - महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा या विषयावर आयोजित विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोपीय भाषणात त्या बोलत होत्या. मंचावर युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि संगीतकार निर्माता कार्तिक शाह उपस्थित होते.

या सत्रात श्री. ब्रिजेश सिंह यांनी महिलांना भेडसावणाऱ्या डिजिटल धोक्यांवर प्रकाश टाकला. एआयची निर्मिती प्रामुख्याने पुरुषप्रधान मजकूर आणि डेटाच्या आधारे झाल्याने त्यामध्ये संवेदनशीलता, न्याय आणि समतेचा अभाव दिसून येतो. ही प्रणाली केवळ कार्यक्षमतेच्या 'हायपर-ऑप्टिमायझेशन' वर लक्ष केंद्रित करते, ज्याचा विपरित परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होत आहे. आकडेवारीनुसार, 'डीपफेक' तंत्रज्ञानाच्या ९१ टक्के बळी महिलाच आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांविरोधात होणारे अत्याचार, डीपफेकसारखे प्रकार यावर निश्चित आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आपण काही बाबी नक्की करु शकतो. सोशल मीडिया कंपन्यांनी 'सेफ हार्बर' नियमांचा आधार घेत जबाबदारी झटकू नये, असे सांगत त्यांनी 'प्लॅटफॉर्म जबाबदारी'वर भर दिला. सत्राच्या प्रारंभी महिला सक्षमीकरणाचा संदर्भ असलेली एआय वर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. या सत्राचे संचालन सलोनी लखिया यांनी केले. श्रीमती आकांक्षा यांनी सहभागी वक्त्यांचा परिचय करुन दिला.



# नगरपरिषद सीओ साहेब, बदली मागू नका - बीड शहर बचाव मंचाची शैलेश फडसे यांना विनंती

बीड ।प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंचाच्या वतीने विविध पक्षांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरपरिषद बीडचे मुख्याधिकारी (सीओ) शैलेश फडसे यांची भेट घेऊन त्यांनी बदली मागू नये, अशी विनंती केली. बीड शहराच्या विकासासाठी त्यांच्या कार्यपद्धतीची आवश्यकता असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

सीओ शैलेश फडसे यांनी बीडमध्ये रुजू झाल्यापासून नगरपरिषदेच्या कामकाजात शिस्त व पारदर्शकता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. विशेषतः नगरपरिषद व्यवस्थेत रूढ झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी तसेच बोगस कंत्राटदार व बोगस बिलांविरोधात उघडलेल्या मोहिमेबद्दल बीड शहर बचाव मंचाच्या वतीने त्यांचे मनापासून कौतुक करण्यात आले. त्यांच्या धाडसी आणि निडर भूमिकेमुळे प्रशासनात सकारात्मक बदल होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

या बैठकीस बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, कायदेशीर सल्लागार ड. अनिल बारगजे, एसडीपीआय पक्षाचे जिल्हा सचिव अब्दुल कादर, आपचे शहराध्यक्ष सादेक सय्यद, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य भूषण पवार, सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# हभप राम महाराज पांगरेकर यांची मुंबई येथे शिक्षक सभा युनियनच्या कार्यकारीणी मध्ये सहचिटणीस म्हणून निवड..



मुखेड ।प्रतिनिधी

दिनांक १४ फेब्रुवारी २०२४ रोजी मुंबई येथील शिक्षक सभेच्या शिक्षक भवन या कार्यालयात हभप राम महाराज पांगरेकर (प्र.शिक्षक) यांची शिक्षक सभेच्या कार्यकारीणीमध्ये बिनविरोध सहचिटणीस म्हणून निवड करण्यात आली. शिक्षक सभा ही मुंबई महानगरपालिकेतील सर्वात जुनी व सर्व शिक्षकांचे प्रश्न वरिष्ठ स्तरावर मांडून शिक्षकांच्या अडचणी सोडवणारी सर्वश्रेष्ठ युनियन म्हणून ओळखली जाणारी युनियन आहे. श्री राम पांगरेकर सरांची निवड करण्यासाठी शिक्षक सभेने कार्यकारी मंडळाची सभा आयोजित केली होती. या सभेस शिक्षक सभेचे अध्यक्ष श्री संदीप टेंभरे सर, सरचिटणीस श्री राजेंद्र मोहिते सर, शिक्षक सभेचे वरिष्ठ श्री नरेंद्रबहादुर सिंह सर, कोशाध्यक्ष श्री आबेद सर, कार्यालयीन चिटणीस श्री वासुदेव मेश्राम सर,शिक्षक सभेचे सर्व पदाधिकारी, बँकेचे सर्व संचालक,एन.एस.टी. विभागातील सर्व शिक्षक उपस्थित होते.श्री राम पांगरेकर हे मुंबईतील विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात. अध्ययन-अध्यापना बरोबरच कार्यालयीन कामावरील पकड सर्वश्रुत आहे. श्री राम पांगरेकर हे महाराष्ट्रातील आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्या संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम सुद्धा राबवले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या संस्थेकडून पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी धर्मशाळा उभारण्याचे कामही प्रगतीपथावर आहे. प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ व्यक्ती म्हणून राम पांगरेकर सरांची मुंबई महापालिकेत ओळख आहे. त्यांच्या कार्याचा आढावा घेऊनच शिक्षक सभेने त्यांना सहचिटणीस म्हणून नियुक्त केले. ही निवड करण्यासाठी सूचक म्हणून श्री ओमप्रताप सिंह सर व या निवडीस अनुमोदन देण्यासाठी श्री कोमल टेंभरे सर उपस्थित होते.श्री राम पांगरेकर सरांची सहचिटणीस म्हणून निवड झाल्यामुळे संपूर्ण मुंबई महानगरपालिकेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## सात जन्मांची साथ,विश्वास,प्रेम आणि कर्तृत्वाची समृद्ध कहाणी

# ज्येष्ठ पत्रकार श्री.उत्तम बोडखे व आदर्श शिक्षिका सौ.बबीता बोडखे यांचा विवाहवर्धापन दिन

आष्टी - (राजेंद्र लाड) सात वचनांना निष्ठेने जपत, परस्परांवरील विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्याची जपणूक करत आयुष्याचा सुंदर प्रवास करणारे ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक झुंजार नेता चे उपसंपादक श्री. उत्तम बोडखे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आदर्श शिक्षिका सौ. बबीता बोडखे यांच्या विवाहाचा वाढदिवस आनंदात साजरा करण्यात आला.

पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रामाणिकपणा, स्पष्टवक्तेपणा आणि सामाजिक भान जपत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे श्री. उत्तम बोडखे यांनी अनेक सामाजिक, शैक्षणिक व लोकहिताच्या प्रश्नांना आपल्या लेखणीद्वारे वाचा फोडली आहे. निर्भीड लेखनशैली आणि सत्यासाठीची बांधिलकी यामुळे त्यांना वाचकांमध्ये विशेष मान मिळाला आहे. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात आदर्श कार्य करणाऱ्या सौ. बबीता बोडखे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्यांची जपणूक आणि विद्यार्थ्यांप्रती ममत्व या गुणांमुळे त्या विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून आहेत. आदर्श शिक्षिका म्हणून त्यांचा गौरव हा त्यांच्या कार्यनिष्ठेचा सन्मान आहे.

दोघांच्याही संसाराची वाटचाल परस्पर सन्मान, समजूतदारपणा आणि सहकार्य यांच्या भक्कम पायावर उभी आहे. पत्रकारितेतील व्यस्त दिनक्रम आणि शिक्षण क्षेत्रातील जबाबदाऱ्या




सांभाळताना त्यांनी कुटुंबव्यवस्थेला दिलेले प्राधान्य हे अनुकरणीय आहे. त्यांच्या सहजीवनातून सामाजिक बांधिलकी, कर्तव्यनिष्ठा आणि कुटुंबमूल्यांची सुंदर सांगड दिसून येते. विवाहवर्धापन दिनानिमित्त कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी पत्रकार, शिक्षकवृंद व शुभेच्छुकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. आपला सहजीवनाचा प्रवास असाच प्रेम, विश्वास आणि समाधानाने बहरत राहो, अशा शब्दांत सर्वांनी त्यांना मंगलकामना दिल्या.

सात जन्मांची साथ जपत, समाजसेवा आणि शिक्षणसेवा या दोन पवित्र क्षेत्रांत कार्यरत असलेले बोडखे दांपत्य हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. त्यांच्या सहजीवनाची ही गाथा पुढील अनेक वर्षे अशीच आनंदमय आणि यशस्वी राहो, हीच सर्वांची सदिच्छा...!!!

# दूरदृष्टी,शेतकऱ्यांप्रती बांधिलकी आणि आधुनिक शेतीचा ध्यास

## मा.आ.भीमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचे भव्य आयोजन

आष्टी - (राजेंद्र लाड) शेतकरी समृद्ध झाला तर देश समृद्ध होतो, या विचाराने प्रेरित होत माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांनी मांडलेली नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल ही संकल्पना आज मराठवाड्यातील एक प्रभावी चळवळ ठरत आहे. त्यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनातून आयोजित करण्यात आलेले डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन हे यंदा सलग तिसऱ्या वर्षी भव्य स्वरूपात आष्टी येथे होत असून, शेतकऱ्यांसाठी आधुनिक शेतीचे ज्ञानदालन खुले होत आहे. माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यकाळात शेतकरी, ग्रामीण युवक व विद्यार्थ्यांच्या प्रगतीला नेहमीच प्राधान्य दिले.

बदलत्या हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारपेठेतील स्पर्धा आणि तंत्रज्ञानातील वेगवान बदल या सर्व बाबी लक्षात घेऊन त्यांनी शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन मिळावे यासाठी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची संकल्पना मांडली.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्न आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित श्री. छत्रपती, शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय, आष्टी यांनी या प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन सुरू केले. आज हे प्रदर्शन मराठवाड्यातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. एखादा उपक्रम सुरू करणे सोपे असते; मात्र तो सातत्याने आणि वाढत्या प्रभावासह पुढे नेणे ही खरी किमया असते. माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या कृषी प्रदर्शनाने पहिल्या वर्षापासूनच मोठा प्रतिसाद मिळवला. दुसऱ्या वर्षी अधिक व्यापक सहभागासह ते अधिक समृद्ध झाले आणि आता तिसऱ्या वर्षी हे प्रदर्शन अधिक भव्य आणि सर्वसमावेशक स्वरूपात होत आहे.

हे प्रदर्शन केवळ कृषी अवजारे किंवा कंपन्यांचे स्टॉलपुरते मर्यादित नसून, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, तज्ञांचे मार्गदर्शन, शंका निरसन, नवीन बियाणे व वाणांची माहिती, ड्रोन तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, सेंद्रिय शेती, पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, फलोत्पादन आणि कृषी प्रक्रिया उद्योग या सर्व क्षेत्रांतील नव्या संधींची ओळख करून देणारे व्यासपीठ आहे.

मराठवाड्यात अनेक कृषी महाविद्यालये असूनही अशा स्वरूपाचे राज्यस्तरीय व व्यापक कृषी प्रदर्शन आयोजित करण्याचे धाडस आणि दूरदृष्टी दाखवणारे आष्टी येथील हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. या उपक्रमामागे माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब यांची स्पष्ट भूमिका आणि ठाम दृष्टीकोन असल्याचे जाणवते. शेतकरी, विद्यार्थी, कृषी तज्ञ आणि उद्योग यांना एकाच छताखाली आणून ज्ञान व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणणे, ग्रामीण भागात आधुनिक शेतीचा प्रसार करणे आणि नव्या पिढीला कृषी क्षेत्रात संधी उपलब्ध करून देणे हे त्यांच्या संकल्पनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या प्रदर्शनामुळे आष्टी तालुका आणि बीड जिल्हा राज्याच्या कृषी नकाशावर ठळकपणे उमटू लागला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष मार्गदर्शन देणारे आणि तंत्रज्ञानाची ओळख करून देणारे हे प्रदर्शन ग्रामीण विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. एकूणच, माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेले डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन हे केवळ एक वार्षिक आयोजन नसून, मराठवाड्यातील शेती परिवर्तनाची चळवळ ठरत



आहे. सलग तिसऱ्या वर्षी होत असलेले हे भव्य आयोजन त्यांच्या शेतकरीप्रेमाची आणि ग्रामीण विकासासाठीच्या समर्पणाची साक्ष देणारे आहे.

डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन याचा भव्य उद्घाटन समारंभ दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे पार पडणार आहे. पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर, नगर-जामखेड रोड, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. एकूणच, मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन हे नव्या युगातील शेतीचा मार्ग दाखवणारे आणि शेतकऱ्यांना सक्षम करणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# धामणगावच्या हिबा सय्यद हिचे दैदिप्यमान यश

## ऑलिम्पियाडमध्ये विज्ञान विषयात सुवर्ण, गणितात रौप्य पदकाची कमाई

**आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील रहिवासी व सहशिक्षक इरफान शहाबुद्दीन सय्यद यांची कन्या हिबा सय्यद हिने अल्पवयातच उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. इयत्ता पहिलीत शिक्षण घेत असलेल्या हिबाने ऑलिम्पियाड परीक्षेत दैदिप्यमान कामगिरी करत विज्ञान विषयात सुवर्ण पदक, तर गणित विषयात रौप्य पदक पटकावले आहे.**

बालवयातच आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत हिबाने दोन्ही विषयांमध्ये उत्कृष्ट यश संपादन केले असून तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

हिबा सध्या आष्टी येथील

अनिषा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, आष्टी येथे इयत्ता पहिलीत शिक्षण घेत आहे. शालेय स्तरावरच स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सहभाग घेऊन तिने आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

हिबा ही कडा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक व पर्चेसिंग ऑफिसर सय्यद साहेब यांची नात असून, प्रसिद्ध माजी क्रीडा शिक्षक सय्यद शहाबुद्दीन सर यांचीही नात आहे. शैक्षणिक आणि सामाजिक परंपरा लाभलेल्या कुटुंबातील हिबाने मिळवलेले हे यश निश्चितच अभिमानास्पद मानले जात आहे.

तिने मिळवलेल्या या यशाबद्दल आ. सुरेश धस, मा. आ. भीमराव धोंडे, मा. आ. बाळासाहेब आजबे, मा. आ. साहेबराव दरेकर नाना, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, प्रा. अजीम सय्यद, डॉ. अश्कान सय्यद, शेख साबिर, प्रा. गफार सर, प्राचार्य अविनाश राऊत,



प्राचार्य पवनकुमार गोडा, क्षितिजा मॅडम, अझीम शेख सर तसेच पत्रकार जावेद पठाण आदी मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. हिबा सय्यद हिच्या या उल्लेखनीय यशामुळे आष्टी तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून भविष्यात ती आणखी मोठी भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जालना शहर महापालिकेच्या सर्व सभेचे थेट प्रक्षेपण सार्वजनिक करावेत!

## महिला नगरसेवकांच्या पतीसह नातेवाईकांनी सभेच्या कामकाजात हस्तक्षेप केल्यास कारवाई करा-विकासकुमार बागडी

जालना/प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेच्या विकास संबंधी व ठोस कार्यवाहीबद्दल झालेल्या सभेचे थेट प्रक्षेपण सार्वजनिक करावे, जेणे करून, कोणताही ठराव गुपित ठेवून, भ्रष्टाचार होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

मा. विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, जिल्हाधिकारी तथा आयुक्त जालना शहर महापालिका यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, महाराष्ट्र शासन परिपत्रक दिनांक २० मे २०२२ रोजी न.प. प्रशासन संचालनालय नपप्रस. न.प. सभा इतिवृत्त /कक्ष -६ /२०२२ /२०९० दिनांक २०-५-२०२२ नुसार सर्व सभा सार्वजनिक होणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मधील कलम ८१ पोटकलम (१२) नुसार नगर परिषदेच्या व महानगरपालिकेच्या प्रत्येक सभेचे कामकाजासंबंधीचे कार्यवृत्त महानगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही रहिवाशास सर्व रास्त वेळी पाहण्यासाठी खुले ठेवणे तसेच महानगरपालिकेचे ठराव अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणे ही ऐच्छिक नसून, सक्तीची कायदेशीर जवाबदारी आहे.



मनपाच्या प्रत्येक मासिक सर्वसाधारण सभेचे व्हिडीओ रेकॉर्डींग करणे, सदर व्हिडीओ रेकॉर्डींग मनपाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करणे, त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुद अंदाजपत्राकत करणे, रेकॉर्डींग नेहमीकरीता जतन व सुरक्षीत ठेवणे, ठराव, कायम केलेले कार्यवृत्त, व्हिडीओ रेकॉर्डींग सात दिवसाच्या आत मनपाच्या व संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे , सदर सभांचे प्रक्षेपण मनपाच्या अधिकृत संकेत स्थळावर , सोशल मिडीया व स्थानिक चॅनलवर प्रसिध्द करणे, सभेमध्ये निवडून आलेल्या महिला नगरसेविका स्वतः उपस्थित राहतील याची खातरजमा करणे, व त्यांच्या पती किंवा इतर अनाधिकृत व्यक्तींनी सभेच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये, याबाबत कठोर निर्देश देणे, कार्यवृत्त व ठरावाची सविस्तर नोंद व प्रसिध्दी सुनिश्चत करणे.वरिल शासन परित्रकांचे पालन न केल्यास संबंधीत अधिकारी, पदाधिकारी यांच्याविरूध्द महाराष्ट्र दप्तर दिरंगाई अधिनियम २००५ मधील कलम ९ व १० महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील कलम ५ तसेच भारतीय दंड संहिता कलम १६६ व १६७ व इत्यादी अन्वये कायदेशीर कारवाई, विभागीय चौकशी व फौजदारी तक्रार दाखल करण्यात येईल याची शासनाने व संबंधीतांनी गंभीर नोंद घ्यावी अशी मागणीही विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

# कब बुलबुल जिल्हा मेळाव्यात हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळेचे घवघवीत यश

धर्माबाद / अशोक पडोळे

भारत स्काऊट गाईड व कब बुलबुल जिल्हा मेळावा नुकताच पारडी तालुका लोहा येथे संपन्न झाला आहे.यामध्ये जिल्ह्यातील अनेक शाळा सहभागी झाल्या होत्या. त्यात हुतात्मा पानसरे प्राथमिक शाळातील कब व बुलबुलची ४५ चिमुकली मुले ही सहभागी होऊन तेथे संपन्न झालेल्या विविध स्पर्धेत सहभाग नोंदवत आठ चषक व प्रमाणपत्र मिळवीत घवघवीत यश संपन्न केले आहे.



सकाळी लोहा येथे काढण्यात आलेल्या शोभायात्रेत कबच्या मुलांनी जाणता राजा या शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित जाणता राजाचे दर्शन घडवत जिल्ह्यात शोभायात्रेत प्रथम क्रमांक मिळवलेला आहे. शोभायात्रेत बुलबुल विभाग ही लक्षवेधी लेझीमची कवायते सादर करीत जिल्ह्यात सर्व द्वितीय क्रमांक मिळवला आहे.दिवसभर संपन्न झालेल्या विविध स्पर्धेत संगीतखुर्ची कब विभाग सर्वप्रथम,संगीतखुर्ची बुलबुल विभाग प्रथम, बादली चेंडू टाकणे कब विभाग द्वितीय, तीन पायाची लंगडी बुलबुल विभाग तृतीय,अशी वैयक्तिक स्पर्धेत कब बुलबुल ने यश संपादन केले आहे . सायंकाळी संपन्न झालेल्या शेकोटी कार्यक्रमात कब ने राज आलं राज हे गीत सादर करीत जिल्ह्यात शेकोटी कार्यक्रमात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर बुलबुल च्या चिमुकल्या मुलींनी गाडी घुंगराची हे लोकगीत सादर करीत जिल्ह्यात सर्वप्रथम क्रमांक मिळवला आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत संपन्न झालेल्या सर्व स्पर्धेत कब व बुलबुल ने सहभागी होत आठ चषक व प्रमाणपत्र मिळवलेले आहेत. जिल्हा मेळाव्यासाठी ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर पालकृतवार, बुलबुल फ्लाक लीडर सौ.सुनीता शाहू,सौ सविता नोरलावार, सौ. अश्विनी रामोड,कब मास्टर विठ्ठल हिमगिरे,कब मास्टर राठोड रवींद्रकुमार, विनायक बारदवार,सहभागी झाले होते. सदरील जिल्हा मेळाव्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली होती.

उत्तुंग कामगिरी करणाऱ्या मुलांचे अध्यक्ष राम पाटील बंगाळीकर सर्व विश्वस्त मंडळ संस्था चे सचिव व विश्वनाथ पाटील बनाळीकर , सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ , पतसंस्थेचे सचिव विठ्ठल नरवाडे, पत्रकार अशोक पडोळे व सर्व सामाजिक शैक्षणिक स्तरावरून मुलांचे कौतुक होत आहे.

# अभिनव जिगे याने जी मेन्स परिक्षेत मिळवले ९७ पर्सेंटाईल

अंबड/प्रतिनिधी

नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जी मेन्स २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये अभिनव संतोष जिगे याने ९७ पर्सेंटाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.या गुणांसह तो आयआयटी प्रवेशासाठीच्या 'जी डव्हान्स्ड' परीक्षेसाठी पात्र ठरला आहे. देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत अभिनवने आपल्या जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले असून या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ९७ पर्सेंटाईल गुण मिळवल्यामुळे त्याला देशातील नामवंत एनआयटी किंवा आयआयआयटी सारख्या संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रवेशाची संधी उपलब्ध झाली आहे.



अभिनवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षकांना दिले आहे. अत्यंत शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्य यामुळेच हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले.आता 'जी डव्हान्स्ड' परीक्षेत यश मिळवून आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे त्याचे पुढील ध्येय आहे.या यशाबद्दल अभिनवचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून,पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# शहागड ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराविरोधात ग्रामस्थांचे उपोषण

## प्रशासनावर जनतेचा रोष,सतीश घाटगे यांची थेट हस्तक्षेपाची मागणी

शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शहागड ग्रामपंचायतीच्या कारभारातील कथित भ्रष्टाचार अनियमितता आणि विकासकामांतील घोटाळ्यांविरोधात संतप्त ग्रामस्थांनी उपोषणाचे हत्यार उपसले असून गावात प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.शासकीय योजनांच्या निधीत गैरव्यवहार निकृष्ट दर्जाची कामे आणि लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचे गंभीर आरोप ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर केले आहेत.या जनआंदोलनाची दखल घेत भाजपा नेते सतीश घाटगे यांनी मंगळवारी उपोषणस्थळी भेट देत आंदोलक ग्रामस्थांशी थेट संवाद साधला.ग्रामस्थांच्या तक्रारी ऐकून घेत घाटगे यांनी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचाराचे आरोप अत्यंत गंभीर असल्याचे सांगत प्रशासनावर तातडीच्या कारवाईसाठी दबाव टाकला.ग्रामस्थांनी विकासकामांतील अनियमितता निधी अपहार कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून प्रत्यक्षात कामे न झाल्याचे गंभीर आरोप घाटगे यांच्यासमोर मांडले.प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने शेवटी उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचा संताप आंदोलकांनी व्यक्त केला.



या प्रकरणावर तत्काळ हस्तक्षेप करत सतीश घाटगे यांनी अंबड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बीडीओ यांच्याशी थेट संपर्क साधून ग्रामपंचायतीच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याच्या सूचना दिल्या.तसेच ग्रामस्थांच्या मागण्या तातडीने निकाली काढण्याची ठाम भूमिका त्यांनी घेतली.

गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवक यांनी आंदोलकांना सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.मात्र प्रशासनाच्या आश्वासनानंतरही ग्रामस्थांमध्ये संशयाचे वातावरण असून प्रत्यक्ष कारवाई होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

उपोषणस्थळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ,आंदोलक,सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर आता आंदोलकांची पुढील भूमिका काय असेल आणि ग्रामपंचायतीच्या भ्रष्ट कारभारावर खरंच कारवाई होणार का याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग क्रमांक ५ मधील बंद हायमास्ट आणि पथदिव्यांची दुरुस्ती

नगरसेवक वसीम सय्यद यांच्या कार्यतत्परतेमुळे नागरिकांचा अंधार दूर

परतूर ।प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग क्रमांक ५ मधील बंद असलेले हायमास्ट दिवे आणि रस्त्यावरील पथदिवे नगरसेवक वसीम सय्यद यांच्या विशेष प्रयत्नांतून अखेर दुरुस्त करण्यात आले आहेत. अनेक वर्षांची ही समस्या मार्गी लागल्याने प्रभागातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून नगरसेवकांच्या या 'उत्कृष्ट कामगिरी'चे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रभाग क्रमांक ५ मध्ये अनेक ठिकाणी हायमास्ट दिवे आणि खांबांवरील लाईट बंद अवस्थेत होते. यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरत असे. अंधारामुळे नागरिकांना येण्या-जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती, तसेच महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या समस्येमुळे परिसरात अपघाताची





आणि चोरीची भीतीही व्यक्त केली जात होती.ही गंभीर समस्या लक्षात घेऊन प्रभागातील नागरिकांनी नगरसेवक वसीम सय्यद यांची भेट घेतली आणि आपली अडचण मांडली. नागरिकांच्या मागणीची तातडीने दखल घेत, वसीम सय्यद यांनी संबंधित परतुर नगरपालिका विभागाकडे पाठपुरावा करून तातडीने दुरुस्तीचे काम पूर्ण करून घेतले. आता संपूर्ण प्रभाग प्रकाशाने उजळून निघाला असून नागरिकांची अनेक वर्षांची प्रतीक्षा संपली आहे.

# जाफ्राबाद तालुक्यात महाशिवरात्री उत्साहात साजरी

जाफ्राबाद - प्रतिनिधी हरी भालके

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त जाफराबाद तालुक्यातील विविध महादेव मंदिरांमध्ये भाविकांची अभूतपूर्व गर्दी उसळली. पहाटेपासूनच हर हर महादेवच्या गजरात वातावरण भक्तिमय झाले होते. हजारो भाविकांनी रांगेत उभे राहून मनोभावे भगवान शंकराचे दर्शन घेतले ,आयोजित करण्यात आले होते. विशेष अभिषेक, पूजाअर्चा, महिलांचे भजन-महाशिवरात्रिनिमित्त संध्याकाळी प्रवचन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसर आकर्षक रोषणाईने सजविण्यात आला होता. भाविकांसाठी पिण्याचे पाणी व प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. श्री गौरीशंकर महादेव मंदिर गोंधनखेडा मंदिर येथे दिवसभर भाविकांची मोठी वर्दळ होती. महारुद्राभिषेक, महामंगळआरती आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, गौरीशंकर महादेव मंदिर येथे शिवपुराण पारायणाचा विशेष कार्यक्रम पार पडला. महिलांच्या हस्ते भगवान महादेवाचे विधिवत पूजन करण्यात आले. बेलपत्र अर्पण, दुग्धाभिषेक आणि मंत्रोच्चारांनी वातावरण अधिकच पवित्र झाले. पारंपरिक वेशभूषेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



यावेळी मंदिराचे मठाधिपती श्री शितल संत स्वामी महेश गिरीजी बाबा , भाविकांना प्रवचनातून मार्गदर्शन केले. शिवभक्तीचे महत्व, शिवपुराणातील तत्वज्ञान आणि श्रद्धा, संयम व सेवा भाव यांचा जीवनातील उपयोग यावर त्यांनी प्रभावी विचार मांडले. त्यांच्या ओजस्वी वाणीतून भाविक मंत्रमुग्ध झाले. गर्दीचे नियोजन करण्यासाठी स्वयंसेवक कार्यरत होते. तसेच माता भगिनींनी परीश्रम तथा श्रमदान केले.पोलिस प्रशासनानेही सुरक्षेची दक्षता घेतली होती. महाशिवरात्रीनिमित्त संपूर्ण तालुका भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. भाविकांनी उपवास, जप-तप आणि पूजाअर्चा करून भगवान महादेवाकडे सुख-समृद्धी व आरोग्याची प्रार्थना केली.पराळ- पाणी ची प्रत्येक होणाऱ्या कार्यक्रमात श्रमदान करणार्या मध्ये समस्त जय जनार्दन भक्त परिवार तसेच सर्व भाविक भक्तांचा सहभाग होता.

# मंठा नगरपंचायतीत स्वीकृत सदस्यांची बिनविरोध निवड

मंठा ।प्रतिनिधी

मंठा नगरपंचायत येथे सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वीकृत (को-ऑप्टेड) सदस्यपदासाठी शरद मोरे व सतीश बोराडे यांनी आपले नामनिर्देशन अर्ज मुख्याधिकारी यांच्या हस्ते सादर केले.नियमित प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्वीकृत सदस्य म्हणून सतीश बोराडे व शरद मोरे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. निवडीची अधिकृत घोषणा होताच नगरपंचायत पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.

नवनिर्वाचित सदस्यांच्या निवडीमुळे नगरपंचायतीच्या कामकाजात अधिक गती येईल



तसेच शहरातील प्रलंबित विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# डिंगांबरराव नानासाहेब बोराडे पाटील यांचे निधन

मंठा । प्रतिनिधी

मंठा येथील ज्येष्ठ नागरिक डिंगांबरराव नानासाहेब बोराडे पाटील यांचे शनिवार, दि. १४ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षे



होते.त्यांच्यावर मंठा येथील जामवाडी मळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दसरा सणाचे ते मानकरी होते. संपूर्ण तालुक्यात 'माली पाटील' म्हणून ते सुपरिचित होते. अत्यंत शांत, नम्र, प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

त्यांच्या पश्चात पत्नी, संजय बोराडे, शरद बोराडे, विजय बोराडे ही तीन मुले, तीन मुली, जावई, सूना, नातू अजिंक्य बोराडे तसेच नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंतिम संस्कार प्रसंगी सामाजिक, धार्मिक, व्यापारी, वैद्यकीय, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाने मंठा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# यात्रेत पोलिसांवर दगडफेक; १४ जणांवर गुन्हा दाखल, होमगार्ड जखमी

मंठा ।प्रतिनिधी

पाटोदा शिवारातील यात्रेत झालेल्या गोंधळप्रकरणी पोलिसांवर दगडफेक केल्याचा प्रकार घडला असून याप्रकरणी १४ जणांसह ८ ते १० अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत होमगार्ड राहुल मनोहर पवार (वय २३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यात्रेदरम्यान तमाशा मंडळासमोर काही व्यक्तींमध्ये वाद सुरू झाला होता. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. यावेळी नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, संबंधित जमावाने पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून शिवीगाळ करत दगडफेक केल्याचा आरोप फिर्यादीत नमूद आहे.

या दगडफेकीत होमगार्ड राहुल पवार यांच्या डाव्या पायाच्या नळीवर, गुडघ्याखाली मार लागून ते जखमी झाले. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा ठपकाही ठेवण्यात आला आहे.

या प्रकरणी आरोपी म्हणून रोहित संतोष अवचार, ज्ञानेश्वर देवीदास खरात, मनोज गोरे, मोहन गोरे, अमोल गोरे, काका रेंगे, आलम शेख (पूर्ण नाव माहित नाही), आदी महादेव अवचार, पवन दादाराव गोरे, आदित्य भगस, गोविंद रेंगे, महेश अवचार, दिपक गोरे, वैभव अवचार (पूर्ण नाव माहित नाही) सर्व रा. विडोळी, ता. मंठा, जि. जालना यांच्यासह अन्य ८ ते १० अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश इधाटे करीत असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# शेतकऱ्यांसह जनतेची परत दिशाभूल

## कथनीवर भर आणि करणी शून्य- किसान सभा

परळी / प्रतिनिधी

अमेरिकेसोबत झालेल्या करारांतर्गत भारतीय कृषी बाजारपेठ ही अमेरिकेकरिता खुली करण्यात आलेली नसल्याचे सांगत शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न राज्याचे प्रमुख पालकत्व असलेले मुख्यमंत्री मा देवेंद्र फडणवीस यांनी करत पुढचं पाठ आणि मागचं सपाट या पद्धतीने मागच्या केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणी बद्दल काहीही ठोस कृती नसताना जेव्हा येईल तेव्हा मराठवाड्याच्या विकासाबद्दल घोषणा करून जायचं असा घणाघात किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी केला.

परळी येथे सोमवार दि १६ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत कॉ.ॲड.अजय बुरांडे यांनी सांगितले की, परळी वैजनाथ येथे आयोजित महा एक्सपो २०२६ पशुप्रदर्शनात मा मुख्यमंत्री यांनी भारत अमेरिका या मध्ये नव्याने झालेला व्यापार करार याचे स्वागत करत मुख्यमंत्र्यांनी देशाचे प्रधानमंत्री यांचे आभार मानले आणि भारतासाठी अमेरिकेची मोठी बाजारपेठ खुली झाल्याचे सांगितले. तसेच कृषी क्षेत्रात कोणत्याही अमेरिकन मालाला भारतात खुली सूट दिली नसल्याचे या करारात लिहिले आहे असे सांगतानाच कृषी क्षेत्रा संदर्भात कसल्याही प्रकारचा समझोता झाला नसल्याचे सांगत काही लोक जाणीवपूर्वक अफवा पसरून कृषी मालाचे मूल्य पाडत असल्याचे ठणकावून सांगितले.

मात्र इथेनॉल, भारतात बंदी असलेल्या जीएम सोयाबीन पासून तयार केलेले खाद्यतेल, सोयापेंड, पशुखाद्य, स्पिरिट, सुकामेवा, फळे, भाज्या व पोल्ट्री कृषी मालावर प्रक्रिया करून तयार केलेले अन्नपदार्थ यासाठी तूर्तास अमेरिकन मालास ०% आयात शुल्कात भारतीय बाजारपेठ खुली करून दिली आणि याच वेळी भारतीय मालावर मात्र १८% आयात शुल्क आकारले. भारतीय कृषी बाजारावर याचा परिणाम होणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी पदग्रहणाच्या वेळी घेतलेल्या शपथीचे स्मरण करून सत्य स्पष्ट करावे. एका बाजूला पर्यावरण, निसर्ग आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे गुणगान गात दुसऱ्या बाजूला उद्योगपत्यांना खाणींसाठी, बंदरासाठी जंगल, जल, जमीन पर्यायी पर्यावरणाचा सगळ्यात मोठा नाश या दहा वर्षाच्या काळामध्ये झालेला आहे.



सोयाबीनचा अफवा उठून भाव पडल्याचे आरोप करताना ५३३० हमीभाव असताना साडेतीन हजार रुपयांमध्ये डिसेंबर महिन्यापर्यंत हमीभावाच्या खाली ज्या शेतकऱ्यांना विकावे लागले त्यांना भावांतर योजनेतून राहत देणार आहात का? कापसाचे भाव हमीभावाच्या खाली घसरलेले आहेत हे भाव घसरवण्यामागे आपल्या धोरणाचा मोठा वाटा नाही का? मिनिमम सपोर्टिंग प्राईस ही बाजारभावाला आधार देण्यासाठी असते सीसीआय अंतर्गत शेतकऱ्यांचा खरेदी केलेला कापूस आपण शेतकऱ्यांकडील माल संपायच्या आत बाजारभावापेक्षा कमी किमतीत बाजारात विक्रीस काढल्याने कापसाचे भाव पडले असून शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे आपल्या धोरणामुळे झालेल्या या नुकसानाची भरपाई आपण भावांतर योजनेतून देणार आहात का? उत्पादन खर्च व त्यावर दीडपट अधिक भाव अशा प्रमाणे आधारभूत किंमत जाहीर करून शेतात उत्पादित झालेल्या शेतमालाची संपूर्ण खरेदी कायद्याच्या स्वरूपात हमी शेतकऱ्यांना देणार का ? मागच्यावेळी करण्यात आलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेचे कामाचे काय झाले? असे प्रश्न किसान सभेने उपस्थित केले असून याबाबत लवकर किसान सभेकडून परळीमध्ये शेतकरी परिसंवाद आयोजित करून अमेरिकेसोबत नव्याने झालेला कराराचा कृषी क्षेत्रावर व सर्व सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनात होणार विपरीत परिणाम आणि केंद्र आणि राज्य सरकारची शेती आणि शेतकरी विरोधी भूमिका आम्ही किसान सभा शेतकऱ्यांसमोर मांडणार आहे सातत्याने सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी दिवसेंदिवस अडचणीत येत आहे आणि सरकार व जबाबदार लोकप्रतिनिधी धादांत खोटे बोलून लोकांची दिशाभूल करत आहेत सोबतच भारताचा प्रमुख कापूस खरीदार देश अमेरिकेतील कापसाची खरेदी करून झिरो टक्के नुसार अमेरिकेत कापड निर्यात करणार आहे तसेच भारतीय टेक्स्टाईल इंडस्ट्रीला सुद्धा अमेरिकेत कापड विकण्यासाठी १८% टॅरिफ माफ करून घ्यायचा असेल तर अमेरिकन कापूस झिरो टक्के देण्याचे अमिष अमेरिकेने दाखवले आहे त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी अक्षरशा उध्वस्त होणार आहे याबद्दल मुख्यमंत्री काहीच का बोलत नाहीत उलट या व्यापार कराराचे स्वागत करतात याची किसान सभा जाहीर निषेध करते या विरोधामध्ये जिल्ह्यात ठीक ठिकाणी मा मुख्यमंत्र्यांच्या या जनतेच्या दिशाभूल करणाऱ्या वक्तव्याचा व मराठवाड्यातील कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्येस सरण रचणारा हा शेतकरी विरोधी भारत अमेरिका करार याची प्रतिनिधिक स्वरूपात उद्या दिनांक १७ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणी होळी करून निषेध करण्यात येईल असे ते म्हणाले. या पत्रकार परिषदेस माकपचे जेष्ठ नेते कॉ.पी.एस.घाडगे, सीआयटीयु संघटनेचे जेष्ठ नेते कॉ.प्रा.बी.जी खाडे, कॉ.पी.एस.घाडगे, कॉ पांडुरंग राठोड, कॉ.गंगाधर पोटभरे, कॉ.प्रकाश चव्हाण आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदेचे आभार प्रदर्शन किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ मुरलीधर नागरगोजे यांनी मानले.

# केज नगर पंचायतीत ३.६२ कोटींचा 'घरकुल' घोटाळा

## उप विभागीय दंडाधिकारी यांच्या कडून सखोल चौकशीचे आदेश भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणले!

केज/प्रतिनिधी

केज नगरपंचायत मधील 'प्रधानमंत्री आवास योजने'अंतर्गत (घरकुल) झालेल्या कोट्यवधींच्या कथित घोटाळ्याने संपूर्ण बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.गरिबांच्या हक्काचे पैसे ठेकेदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांनी संगनमताने लाटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून,या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत उपविभागीय दंडाधिकारी यांनीसखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.या हाय-प्रोफाइल चौकशीमुळे भ्रष्ट अधिकारी,पुढारी आणि बोगस लाभार्थ्यांचे धाबे दणाणले आहेत.

नेमके प्रकरण काय?

केज नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांना हक्काचे पैसे मिळण्याऐवजी,ते पैसे नियमबाह्यपणे इतरत्र वळवण्यात आले आहेत. मे २०१९ ते जानेवारी २०२२ या कालावधीत म्हाडाकडून प्राप्तझालेला निधी आणि त्यावरील व्याजाची रक्कम लाभार्थ्यांना न देता,ती ठेकेदार व कर्मचाऱ्यांना धनादेशाद्वारे वाटण्यात आली.




घोटाळ्याची भीषणता,निधीची लूट

३७४ लाभार्थ्यांच्या हक्काच्या ८ कोटी १० लाख रुपयांपैकी तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांवर डल्लामारण्यात आला आहे.

ज्या कामांसाठी पैसे दिले गेले,त्या कामांच्या कोणत्याही संचिका, देयके किंवा मोजमाप पुस्तके(चशर्रीीशाशपीं इेज़ी) नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध नाहीत.

अर्धे तुम्ही घ्या,अर्धे आम्ही घेतो अशा भ्रष्ट तडजोडीतून हा सर्व प्रकार घडल्याचा संशय आहे.उप विभागीय दंडाधिकारी यांच्या कडून चौकशीचा फास आवळला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सूचनेनुसार,उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी आता या प्रकरणाची सूत्रे हाती घेतली आहेत.प्रशासनाने नगरपंचायतीकडून घरकुलांचे सर्व रेकॉर्ड्स, बँक स्टेटमेंट्स आणि लाभार्थ्यांची यादीताब्यात घेण्यास सुरुवात केली आहे.

शासकीय योजनेचा पैसा गरजूंपर्यंत पोंहोचण्या ऐवजी जर तो चुकीच्या मार्गाने जात असेल,तर त्याची गय केली जाणार नाही.दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

प्रशासन सूत्रे कोणाचे चेहरे समोर येणार?

समितीने बँकेकडून व्यवहारांचे सर्व तपशील मिळवले असून,त्यातून पैसे लाटणाऱ्यांची एक मोठी यादी समोर आली आहे.यामध्ये केवळ धनादेश देणारे अधिकारी च नव्हे,तर बेकायदेशीर पणे पैसे स्वीकारणारे ठेकेदार,कर्मचारी आणि काही भ्रष्ट स्थानिक पुढारी देखील उप विभागीय दंडाधिकारी यांच्या रडारवर आले आहेत.या चौकशीतून केज शहरातील भ्रष्टाचाराचे नेमके किती 'बडे मासे' गळाला लागतात,याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप व भारत जगताप यांना पितृशोक

## नामांकित उद्योजक व शेतकरी अभिमन्यू जगताप यांचे निधन

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायतचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप व भारत जगताप यांचे वडील, शहरातील नामांकित उद्योजक तथा शेतकरी अभिमन्यू जगताप यांचे महाशिवरात्रीच्या पावन दिवशी दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. १०:१५ वाजता उपचारादरम्यान निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, भारत जगताप, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अभिमन्यू जगताप हे वडवणी शहरातील उद्योग, शेती व सामाजिक क्षेत्रातील एक विश्वासार्ह आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. त्यांच्या निधनाची वार्ता वाऱ्यासारखी संपूर्ण शहरात पसरताच हळहळ व्यक्त करण्यात आली. राजकारणातही ते

चाणक्य म्हणून परिचित होते. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना उद्योग-व्यवसायाचे धडे देत योग्य मार्गदर्शन केले. त्यांच्या संस्कारांमुळेच आज



जगताप बंधूंनी बाजारपेठेत भक्कम ओळख निर्माण केली आहे. उद्योगात मोठं व्हायचं असेल तर जगताप बंधूंचा आदर्श घ्यावा, अशी भावना वडवणीतील व्यापारी व नागरिक व्यक्त करतात. अभिमन्यू जगताप यांच्या जाण्याने जगताप परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून शहरात

शोककळा पसरली आहे.

त्यांच्यावर वडवणी येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, पत्रकार, डॉक्टर, वकील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या

संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आमच्या डोक्यावरचं बाप माणसाचं छत्र हरपलं, आम्ही पोरके झालो, अशा भावनिक शब्दांत नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी सोशल मीडियावर आपल्या भावना व्यक्त केल्या. जगताप परिवाराच्या दुःखात दैनिक प्रवक्ता लोकशाहीचा परिवार सहभागी असून अभिमन्यू जगताप यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.



गेवराई /प्रतिनिधी

**गेवराई शहरातील कोल्हेरवेस तहसील रोड रोड दाभाडे गल्ली येथे महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुका अध्यक्ष नागेश पंडित यांनी सामाजिक भान लक्षात घेऊन पाणपोई सुरू केली आहे तिचे उद्घाटन युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून नगरपरिषद गेवराईचे उपनगराध्यक्ष भगवान जिजा घुबर्डे, आदर्श शिक्षक माजी मुख्याध्यापक राजेंद्र घुंबर्डे सर प्रकाश आधार चे संपादक सुनील पोपळे नाभिक समाजाचे नेते नानासाहेब पंडित, बाप्पा जाधव, मोहन अप्पा बेंद्रे, बाबासाहेब सावंत, सागर ठाकूर, गोरख मोटे , ऋषिकेश मोटे विजय पंडित हरि पंडित फुले शिवांश पंडित रवी दाभाडे, बाबा वाघमारे, गणेश भुते, नारायण जगताप, नारायण मुलुक, माजी नगरसेवक शाम काका येवले,राजेंद्र मोटे ,रमेश मोटे प्रेम मोटे राहुल भैया मोटे भाऊसाहेब नाना दाभाडे, अशोकरावजी मडकर, शिवाजीराव लिंगशे,अक्षय आंभाईक कर, रवी मडके, नंदू शिदे आदी मंडळी उपस्थित होते**

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने

# आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर रविवारी विशेष व्याख्यानाचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) यांचे आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा, मैत्री आणि सामाजिक बांधिलकीचा ध्यास जोपासत आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणादायी उपक्रम म्हणजे आनंदी आयुष्याचा मंत्र एक विशेष व्याख्यानमाला आयोजित केली आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली आपण अनेकदा आनंद हरवून बसतो. आनंदी, सकारात्मक आणि समाधानी जीवन कसे जगावे ?, मानसिक स्वास्थ्य, नातेसंबंध आणि आत्मविश्वास कसा वाढवावा या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारे प्रेरणादायी व्याख्यान रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आले असून यावेळी प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) हे आपले मौलिक विचार व्यक्त करून अनमोल मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानातून आपण आनंदी राहण्याचे वैज्ञानिक व व्यावहारिक मार्ग, सकारात्मक विचारांची ताकद, ताण-तणावावर प्रभावी उपाय, यशस्वी व समाधानी जीवनाची गुरूकिल्ली हे जाणून घेणार आहोत. तरी अंबाजोगाई शहर व परिसरातील आपण सर्वांनी उपस्थित राहून या ज्ञानमय व प्रेरणादायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे रो.भिमाशंकर शिंदे (अध्यक्ष), रो.सुनील व्यवहारे (सचिव) आणि रो.पुरूषोत्तम रादंड (प्रोजेक्ट डायरेक्टर) यांनी केले आहे.



# साने गुरुजी निवासी विद्यालय हे केज तालुक्यातील उत्तम शिक्षण देणारे संकुल म्हणून नावलौकिक प्राप्त-प्रा.हनुमंत भोसले

केज/प्रतिनिधी

साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय केज येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभात मार्गदर्शन करताना प्रा.हनुमंत भोसले सर यांनी सांगितले की,आपले करिअर यशस्वी करण्या साठी आपल्याला एका चांगल्या मार्गदर्शकाची आवश्यकता असते. आजचा हा निरोप समारंभाचा कार्यक्रम हा मौज मजेचा नसुन आपल्या भविष्याचा विचार करण्याचा आहे. दहावी नंतर आपण आपल्या ख-या करिअर सुरवात करण्यासाठीचा आहे.विद्यार्थी मित्रानो

तुमच्या कार्याने मोठे व्हा एका क्षेत्रात प्रगती करा प्रत्येक दिवस हा नवीन सुरुवात असते परिश्रम करणारा विद्यार्थी हा यशस्वी होतोच यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे नियोजित वेळापत्रक करुन अभ्यासाचा नियोजन करावे जगात आफाट अशा संधी असुन अचुक संधी शोधून संधीचा उपयोग कसा घेतो यावर अवलंबून



आहे.मानव सेवा हीच ईश्वर सेवा असुन जगात एकच ईश्वर आहे ते म्हणजे आपले आई आणि वडील आहे.त्यांची प्रेरणा घेऊन वाटचाल केल्यास आपण कुठेच कमी पडणार नाही आणि आई वडील आणि गुरुजींना आपल्या जीवनातील खरे मार्गदर्शक म्हणून मान दिले पाहिजे गुरु हा आपल्या शिष्यांचा कधीच वाईट होईल असे मार्गदर्शन करत नाहीत गुरुजनांना आपला विद्यार्थी नेहमीचयशाच्या शिखरावर असावा असे वाटते.साने गुरुजी निवासी विद्यालय केज च्या संकुलात चांगल्या प्रकारे गुणवत्ता पुर्वक शिक्षण दिले जाते या संकुलात इयत्ता दहावी व बारावीच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षांचे केंद्र असून या केंद्रात भयमुक्त वातावरणात परिक्षा पार पडतात याचा मला स्वतःला चांगला अनुभव आहे असे मार्गदर्शन पर मत व्यक्त केले या प्रसंगी व्यासपीठावर बीडजिल्हा ऊसतोड कामगारविकास मंडळ केजच्या संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड,उपाध्यक्ष श्री. राजेश कापसे व या संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता गित्ते कराड मॅडम व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# रेणुका देवी संस्थान विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करु - आमदार सुरेश धस

पाटोदा : प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी शनिवारी (दि. १४ फेब्रुवारी) पाटोदा नगरपंचायत कार्यालयात नागरिकांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी पाटोदा शहरातील रेणुका देवी माळावरील रेणुका माता मंदिर, पाटोदा संस्थानच्या विश्वस्त मंडळाने त्यांची भेट घेऊन मंदिर परिसराच्या विकासासंदर्भात सविस्तर चर्चा केली.

मंदिर परिसरात वाढत्या भाविकांच्या संख्येमुळे सभागृहाची अत्यंत गरज निर्माण झाली असून, त्यासाठी आमदार निधीतून आर्थिक सहाय्य देण्याची विनंती विश्वस्त मंडळाने केली. सध्या मंदिर परिसरात छत्रपती संभाजीनगर येथील भक्त सतीश वैद्य यांच्या वैयक्तिक खर्चातून स्लॅबचे काम सुरू असल्याची माहितीही विश्वस्तांनी आमदारांना दिली.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट शब्दांत आश्वासन देत सांगितले की, रेणुका देवी संस्थान हे



विश्वस्त मंडळाची आमदार सुरेश धस यांना भेट; सभागृह उभारणीसाठी आमदार निधीतून मदतीची मागणी

श्रद्धास्थान असून या पवित्र स्थळाच्या विकासासाठी आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू. आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण करून योग्य प्रस्ताव सादर करावा, शासन पातळीवर सकारात्मक पाठपुरावा केला जाईल.

सभागृह उभारणीसंदर्भात आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश आमदार धस यांनी संबंधितांना दिल्याची माहिती विश्वस्त मंडळाच्या वतीने देण्यात आली.

यावेळी संस्थानचे सचिव पत्रकार ड. महेश बेदरे, कोषाध्यक्ष संपत मुळे, सहसचिव संतोष नाईकनवरे, सदस्य सचिन गाडेकर यांच्यासह राऊत वस्ती व मुळे वस्ती शिवारातील सुभाष गुंड, बापूराव भवर तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबत सामाजिक विकासही नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य होणार-डॉ. नितीन करमळकर



नांदेड ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे घटक व त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे उपक्रम या विषयावरील कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे माजी कुलगुरू तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. नितीन करमळकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन केले. ते म्हणाले की, गेल्या ७०-७५ वर्षांत अभ्यासक्रमात फारसा बदल झाला नव्हता; मात्र नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षणपद्धती, अभ्यासक्रम, कौशल्यविकास आणि सामाजिक भान या सर्व बाबींचा सखोल विचार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवीपर्यंत मर्यादित न ठेवता त्यांच्या सामाजिक, बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे हेच या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शातील सुमारे २० टक्के विद्यार्थी केंद्रीय विद्यापीठांमध्ये तर ८० टक्के विद्यार्थी राज्य विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असल्यामुळे या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी राज्य विद्यापीठांमधून होणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. गुणवत्तापूर्ण शिक्षणातून सर्वगुणसंपन्न पिढी घडविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे हे विद्यापीठांचे प्रमुख ध्येय असून मराठवाड्यातील विद्यार्थी अत्यंत गुणवंत आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, डॉ. संतराम मुंडे, डॉ. संगीता माकोने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केली, तर सूत्रसंचालन आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांनी केले.

### तामसा येथे २१ फेब्रुवारी रोजी मातंग समाज परिषद आयोजित

# महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रेचा गायणाचा कार्यक्रम

तामसा ।प्रतिनिधी

लहुजी शक्ती सेना, हदगाव हिमायनगर मतदार संघ यांच्या वतीने शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता तामसा ता.हदगाव,जि.नांदेड येथील जिल्हा परिषद हायस्कूल मैदानावर मातंग समाज परिषद मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली आहे.या कार्यक्रमास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांच्या गायणाच्या माध्यमातुन प्रबोधन व मातंग समाजाच्या शैक्षणिक,आर्थिक,सामाजिक व राजकीय प्रगतीच्या दृष्टीने सखोल चर्चा व्हावी समाजातील विविध प्रश्नांवर मार्गदर्शन मिळावे आणि भावी दिशा निश्चित व्हावी या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

मातंग समाजातील युवक,महिला,ज्येष्ठ नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी,असे आवाहन लहुजी शक्ती सेनेच्या आयोजकांनी केले आहे.या परिषदेच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोक चव्हाण उपस्थित राहणार आहेत.मातंग समाजाचे समाज भुषण म्हणुन प्रमुख मार्गदर्शक.विष्णु कसबे (लहुजी शक्ती सेना,राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य) मार्गदर्शन करणार आहेत. उद्धाघाटक म्हणून आ.हेमंत पाटील यांची उपस्थिती लाभणार आहेत.तसेच प्रमुख अतिथी म्हणून आ.बाबुराव कदम कोहळीकर,स्वागताध्यक्ष आ.जितेश अंतापूरकर, प्रमुख वक्ते म्हणून कैलास खंदारे (प्रदेश अध्यक्ष,लहुजी शक्ती सेना) आपले विचार मांडणार आहेत.या परिषदेत मातंग समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली जाणार असून,शिक्षण,रोजगार,सामाजिक न्याय,शासकीय योजना व राजकीय सहभाग या विषयावर मार्गदर्शन व पुढील कृती आराखडा जाहीर केला जाणार आहे.लहुजी शक्ती सेना,हदगाव हिमायतनगर यांच्या वतीने सर्व मातंग बांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी करावी,असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य आयोजक के.डी.पवार जिल्हा संपर्क प्रमुख लहुजी शक्ती सेना, लहुजी शक्ती सेना हदगाव तालुका अध्यक्ष धर्मराज गायकवाड,तसेच लहुजी शक्ती सेना युवा हदगाव तालुका प्रमुख शिवाजी वाघमारे,लहुजी शक्ती सेना हदगाव तालुका संपर्क प्रमुख आनंद वाघमारे,लहुजी शक्ती सेना तामसा सर्कल प्रमुख ज्ञानेश्वर शेळके,लहुजी शक्ती सेना शहर प्रमुख राहुल गाडेकर यांनी करण्यात आले आहे.

# कपिल इलेव्हन संघ खासदार चषकचा ठरला विजेता

## अझहर इलेव्हन संघ उप विजेता



युवकांसाठी मैदानी खेळ काळाची गरज - खा.रवींद्र चव्हाण

मुदखेड ।प्रतिनिधी

नागेली (ता मुदखेड ) क्रिकेटच्या साखळी सामन्यातील खासदार चषकचा विजेता कपिल इलेव्हन संघ मुदखेड ठरला असून उपविजेतेपद माळकौठा च्या अझर इलेव्हन क्रिकेट संघाने पटकाविले असून ग्रामीण भागातील क्रिकेट प्रेमी खेळाडूंना वाव मिळाला असून युवा पिढीसाठी मैदानी खेळ काळाची गरज असल्याचे प्रतिपादन खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले आहे.

स्वातंत्र्य सेनानी स्मरणार्थ खासदार चषक क्रिकेट साखळी सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील ६० क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. क्रिकेट साखळी सामन्यात अंतिम फेरीत कपिल इलेव्हन संघ तसेच अजहर इलेव्हन संघ यांच्यात रोमांचक सामना झाला. या अतितटीच्या सामन्यात कपिल इलेव्हन संघ खासदार चषक विजेता ठरला आहे. यावेळी खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्त विजेत्या संघास ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ३३३३३/- रुपये देऊन सन्मानित करण्यात आले आहे. उपविजेता संघास जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर यांच्या हस्ते ट्रॉफी ,सन्मानचिन्ह, रोक २२२२२/- रुपये देऊन संघाचा गौरव करण्यात आला. तृतीय क्रमांकाचे पारितोषिक काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या हस्ते ट्रॉफी, सन्मानचिन्ह, रोख ११११११/- रुपये देऊन संघास प्रोत्साहित करण्यात आले आहे. यावेळी यावेळी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक यशपाल भिंगे, काँग्रेस किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे, काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर राजेगोरे, माजी उपसरपंच जनार्दन शिंदे, आयोजक गणपत शिंदे, बालाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते स्वतंत्र सैनिकांचे वारस आनंद गिरी, रतन गिरी, कचरू शिंदे, आनंद गव्हाणे, मारोती पाटील पुयड, विनायक पुयड, काशीराम कुऱ्हाडे, गफूर शेख, विठ्ठल तामसेकर, चंद्रभान गव्हाणे, माधव पांचाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला आहे. क्रिकेट साखळी सामन्यातील मॅन ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज , उत्कृष्ट झेल या क्रिकेटपटूंना आकर्षक बक्षीसे बहाल करण्यात आली आहेत. उत्कृष्ट पंच राहुल शिपरकर , संदीप गव्हाणे तसेच समालोचक अरविंद जाधव वडगावकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

# काँग्रेसला बदनाम करण्याचा कुटील डाव - खा. रवींद्र चव्हाण

## पक्ष संघटन मजबुतीचा कार्यकर्त्यांचा निर्धार



मुदखेड ।प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाची विचारधारा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारी असल्याने जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून पक्षप्रवेशाच्या वल्गना करणे म्हणजे पक्षाला बदनाम करण्याचा कुटील डाव असून पक्ष संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी वज्रमुठ बांधली असून राजकारणात काहीही होऊ शकते तेच नेते भविष्यात काँग्रेस पक्षात येऊ शकतात अशी गुगली टाकत भाजप पक्षप्रवेशाला पूर्णविराम दिला आहे.

मुदखेड तालुका काँग्रेस जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन ता. १४(शनिवार) खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले आहे. माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोतावर अध्यक्षस्थानी होते. काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष प्राध्यापक यशपाल भिंगे , जिल्हा कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष माधव पवळे , तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, उबाठा सेनेचे तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव पुयड , जिल्हा सचिव सूर्यकांत चौदंते, गिरीश कोत्तावार , युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष मुजीब पठाण,गंगाधर डांगे, नवनिर्वाचित नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड , कदीर भाई, माझी उपनगराध्यक्ष करीम साब यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनी तालुक्यात प्रत्येक गावागावात काँग्रेसची विचारधारा पोहोचून संघटन मजबुतीसाठी वज्रमुठ बांधण्याचा निर्धार केला आहे.

यावेळी बोलताना खा.रवींद्र चव्हाण म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपचे नेते काँग्रेस पक्षाची बदनामी करण्याचा धंदा सुरू केला आहे. काँग्रेसचे मजबुतीकरण आता पक्षात राहून मोठमोठे पदे उपभोगणाऱ्या नेत्याच्या मतदारसंघा पासूनच सुरुवात करण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. प्रा.यशपाल भिंगे यांनी सध्या केंद्रातील व राज्यातील सरकार सर्वसामान्य जनतेचे शोषण करीत असून हिंदुत्वाच्या नावावर जातीजातीत भांडणे लावून दिशाभूल करीत असल्याचे सडकून टीका मोदी सरकारवर केली. यावेळी पप्पू पाटील कोंडेकर यांनी भविष्यात काँग्रेसला चांगले दिवस येणार असून भाजपाच्या फोडाफोडीच्या राजकारणाच्या प्रलोभनाला बळी न पडता काँग्रेसने आता निष्ठावंताच्या साह्याने आपला पक्ष बळकट करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी राजेश पवार निवघेकर , रमेश बोडके, विश्वनाथ पवार, महेश देशमुख,भगवान पवार, बळवंत पाटील पुयड, शिवाजी वडजे, नागोराव भांगे, सुनील निखाते, माधव अक्कमवाड, मुलतानी, माणिकराव मुंगल, कुलदीप मल्लेवार , वेदांत शेवटे, तेजस जाधव , संभाजी गाडे , सुरेश गोवंदे, गणेश सूर्यतळे, महेश पवार, नंदु पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# मांजरम येथे २२ फेब्रुवारीला राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन

## पुरस्कार वितरण व साहित्य-संस्कृतीची मेजवानी

नायगाव ।प्रतिनिधी

मुकनायक वाचनालय मांजरम आणि सप्तरंगी साहित्य मंडळ, नांदेड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता कै .माधवराव शिंदे गुरुजी साहित्य नगरी, मांजरम येथे करण्यात आले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून साहित्य, विचार आणि संस्कृतीची समृद्ध मेजवानी साहित्यप्रेमींना अनुभवता येणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन उद्योजक बालाजी बचेवार यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. रामकृष्ण बदने राहणार आहेत. विशेष प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर ,पोलिस उपअधीक्षक बिलोली श्याम पानेगावकर साहेब,आणि रिपाईचे राज्याध्यक्ष मधुकर मांजरमकर यांच्या सह अनेक मान्यवर यांची उपस्थिती राहणार आहे. .

संमेलनात मुक नायक वाचनालयाचे मुख्य सूत्रधार डी. के.वाघमारे गुरुजी यांना जीवन गौरव पुरस्कार,जेष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांना राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार,भीमराव तरटे जगनराव गोणारकर, साहेबराव देवदे,प्रा. संजयकुमार मांजरमकर,प्रा. गजानन देवकर बळीराम नव्हारे गुरुजी,शिवाजी शिंदे ,शंकर माने वजीरगावकर शिवाजी मलदोडे,संजय पाटील ,श्रीकांत गोणारकर, कपिल डूमणे, विलास शिंदे,किशोर वाघमारे बारूळकर,माधुरी पिंगळे,शेख आरीफ,अंजली मुनेश्वर या सह उत्कृष्ट साहित्य, पत्रकारिता, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

कै.भाई दिगंबर शिंदे विचार मंच या वर सदर होणाऱ्या साहित्य संमेलनात काव्यवाचन, परिसंवाद, ठराव वाचन आणि समारोप असे विविध कार्यक्रम दिवसभर पार पडणार आहेत. समारोप प्रसंगी प्रा. प्रल्हाद हिंगोले, प्रा. डॉ. रामकृष्ण बदने आणि आयोजक जीवन मांजरमकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीने होणार असून सकाळी १० वाजता चित्र व नाणे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १०.३० वाजता विचारमंचाचे उद्धाटन ,उद्धाटन कार्यक्रम पुरस्कार वितरण होणार आहे . दुपारी १.३० वाजता मध्यंतर दुपारच्या सत्रात २.३० वाजता परिसंवाद, ४ वाजता कथाकथन, सायंकाळी ६ वाजता नामवंत गझलकारांच्या सहभागाने गझल संध्या, तर रात्री ७ वाजता राज्यातील विविध भागांतील कवींच्या सहभागातून कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन व साहित्य महोत्सवाला साहित्यिक, विद्यार्थी आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन स्वागताध्यक्ष सचिन कांबळे,आदर्श शिक्षक शिवाजी कोंकेवाड,आयोजक जीवन मांजरमकर मुकनायक वाचनालय मांजरम आणि जिल्हाध्यक्ष रणजीत गोनारकर व सर्व पदाधिकारी सप्तरंगी साहित्य मंडळ, नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संशोधन केंद्राच्या समन्वयक पदी डॉ. नितीन गायकवाड




किनवट ।प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत किनवट येथे कार्यरत असलेल्या कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्राच्या समन्वयकपदाची सूत्रे डॉ. नितीन गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. मावळते समन्वयक डॉ. मार्तंड कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांनी पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. गायकवाड यांनी केंद्र हे केवळ औपचारिक उपक्रमांचे ठिकाण न राहता, आदिवासी समाजाच्या वास्तवाशी जोडलेले, संशोधनाधिष्ठित व परिवर्तनवादी कार्य करणारे सक्षम व्यासपीठ म्हणून विकसित करण्याचा निर्धार व्यक्त केला. स्थानिक ज्ञान, परंपरा व लोकसंस्कृतीचा सन्मान राखत संशोधनाला दिशा देण्यावर भर राहील, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रम प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती. नव्या नेतृत्वाखाली केंद्र सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती व कौशल्य विकासाच्या दिशेने अधिक परिणामकारक वाटचाल करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

### जगद्गुरु संत सेवालाल महाराज यांच्या २८७ वी जयंती उत्सवात साजरी

भोकर ।प्रतिनिधी

भोकर - बंजारा समाजाचे आराध्य दैवत जगद्गुरु संत सेवालाल महाराज यांची भोकर येथे दि १५ फेब्रुवारी रोजी २८७ वी जयंती साजरी करण्यात आली.. वसंतराव नाईक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून जगद्गुरु संत सेवालाल महाराज मिनी नंगारा भवन किनवट रोड पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आले. या मिरवणुकीमध्ये पोहरादेवी येथील महंत शेखर महाराज व साधुसंत यांची रथ काढण्यात आले.भोकर तालुक्यातील सर्व बंजारा समाज बांधव ,महिला, तरुण, तरुणी हजारोंच्या संख्येमध्ये या जयंती मध्ये सहभाग नोंदवले, या भव्य दिव्य रॅलीमध्ये डफडा च्या तालीत बंजारा समाज संस्कृती पहनावामध्ये महिला पुरुष यांनी वाजत गाजत भव्ययात्रा काढली, श्री नारायणा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल तर्फे विद्यार्थ्यांनी बंजारा समाज सांस्कृतिक देखावा सादर केले.या मध्ये संत सेवालाल महाराज, परमपूज्य डॉ.रामराव महाराज, लकीशा बंजारा, सोमा भंगी , बंजारा समाज रूढी परंपरा चित्र प्रदर्शन या रॅली मध्ये दाखवले. सार्वजनिक जयंती मंडळ अध्यक्ष साई राठोड, उपाध्यक्ष मारोती राठोड ,वसंत जाधव कार्याध्यक्ष रमेश राठोड सर्व जयंती मंडळ पदाधिकारी यांनी भरपूर परिश्रम घेतले. प्रमुख पाहुणे म्हणून बंजारा समाजाचे प्रतिष्ठित नागरिक तथा उद्योजक मा.बंटी राठोड , भोकर नगर पालिकेचे नगरअध्यक्ष मा.भगवान दंडवे , दिलीप सोनवाडे ,तहसीलदार विनोद गुंडमवार,दिवाकर रेड्डी ,मुदखेडचे नगरसेवक रामसिंग चव्हाण,जगदीश पाटील भोसीकर ,मुसळे , नागनाथ घिसेवाड, नगरसेवक आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली, मिनी नंगारा भवन येथे महंत शेखर महाराज यांच्या हस्ते भोग लावल्या गेले. कार्यक्रमांमध्ये आलेल्या सर्व प्रमुख पाहुणे यांचे सार्वजनिक जयंती मंडळाकडून सर्वांचे सत्कार करण्यात आले, व तसेच जगद्गुरु संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त महाप्रसादाचा देखील कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

# घरातील माय गोठ्यातील गाय सुखी तेव्हाच देश समृद्ध शिभप.मोहनराव कावडे महाराज हसनाळीकर

नायगाव ।प्रतिनिधी

देव कोणत्याही मंदिरात नसतो फक्त मंदिर हे श्रद्धेचे ठिकाण असते खरा देव तर आपल्या माणुसकीत असतो आपण माणुसकी जपली पाहिजे आपण दोष मुक्त होऊन यावे आणि भक्त होऊन जावे हेच कीर्तनातील रहस्य आहे ज्या घरात प्रेम असते त्या घरी देव असतो म्हणून आपण एक वेळेस उपाशी राहावे पण दुखी समदुखी शेजारच्या लोकांना आपण माणुसकीच्या नात्याने आधार द्यावा असे अमृतवाणी विचार शिभप मोहनराव कावडे महाराज हसनाळीकर यांनी आयोजित कीर्तनरुपी सेवेत दिले.

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह समस्त गावकऱ्यांच्या वतीने आयोजित केला होता, कीर्तनरुपी सेवेच्या सातव्या दिवशी शिवभक्त परायण मोहनराव कावडे महाराज हसनाळीकर यांनी हेचि मागणी रे देवा,तुझा विसर नसावा.. या मागणी पर अभंगातून द्वारे सेवा देताना प्रदीप चव्हाण परभणी,चंद्रशेखर आणेराये यांनी मृदंगावर साथ दिली तर सुंदर बासरी वादन विजयकुमार द्रोणाचार्य यांनी केले व गायन आणि टाळ बाबूराव चांडोळकर,भास्कर चांडोळकर,जनार्दन बेंद्रिकर, हावगी पन्नासे,रामदास वसमते, शिवानी वसमते लोहगावकर, उत्तम धानोरकर,बालाजी चौधरी यांनी संगीताची भरीव साथ दिल्याने सर्वत्र संगीतमय भक्ती वातावरण निर्माण झाले होते, शिभप.हसनाळीकर महाराज किर्तन सेवेत पुढे म्हणाले की, वासना मोह अहंकार काढण्यासाठीच किर्तन असते माझ्या स्वतःसाठी कीर्तन मी कधीच केले नाही तर माझ्या अनाथ मुलांची सेवा करण्यासाठी माझी कीर्तन सेवा असते असे सांगत जाळ लावणारी वस्तू डब्बी असते म्हणून तिचे कधी भाव वाढत नाहीत तसे माणसांचं देखील आहे आपण आग लावणारी डबी होता कामा नये असाही त्यांनी मौलिक संदेश यावेळी भाविकांना दिला आहे यावेळी शेळगाव छत्रीसह परिसरातील भावीक भक्तजन महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती